Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

* वर्ष ५४ * अंक १५९ * * नागपूर * | मंगळवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्रलेख

## खरीखरी...

# कृतघ्नतेची परिसीमा

काल केंद्रीय मंत्रिमंडळातील पंजाबच्या कुणा बिट्टू नावाच्या राज्यमंत्र्याने राहुल गांधी क्रमांक एकचे आतंकवादी आहेत, असे वक्तव्य केले. अशा प्रकारचे वक्तव्य करून आपल्या मूर्खपणाचेच त्या बिट्टूने समर्थन केले. या बिट्टूचे आजोबा बियांतसिंग पंजाबचे मुख्यमंत्री होते. आतंकवाद्यांनी त्यांची हत्या केली होती. या बेअकली बिट्टूला राहुल गांधी यांनी तीन वेळा खासदार बनवले होते. यावेळी तो निवडून येऊ शकणार नाही असा सर्व्हे आल्यामुळे त्याला तिकीट नाकारण्यात आले. मग हा प्राणी भारतीय जनता पक्षात गेला आणि खासदारकीच्या निवडणुकीत पडला. तरीही, पडला तरी टांग वर अशा अविभार्वात केंद्रात त्याला मंत्रीपद देण्यात आले. अशा लोकांचे एकच काम असते. ते म्हणजे आपल्याच जुन्या नेतृत्वाचे म्हणजे गांधी परिवाराला शिव्या देऊन स्वतःला धन्य समजणे. या बिट्टूच्याही वरताण आसामचा मुख्यमंत्री सरमा आहे. यांच्याशिवाय इतरही अनेकांना काँग्रेसच्या तिकिटांवर निवडून आणले गेले. बरीच पदे दिली गेली. आता हे सर्व केवळ गांधी परिवारावर भुंकण्यासाठी भाजपने सोडलेले प्राणी बनलेले आहेत. भारतीय जनता पक्षात अशा बुजगावण्यांना सध्या मोठ्या भाव आलेला आहे. हे लोक आपली औकात विसरून जे बोलतात. त्यामुळे त्यांचीच बेईज्जती होते, हे त्यांनाही कळत नाही. हेमंत बिस्वा सरमा किंवा ज्योतिरादित्य सिंदिया हे उद्या मोदी आणि शहा सत्तेवर नसले. तर भाजपात अडगळीत पडणार आहेत. दहा वर्षांपूर्वी पर्यंत भाजपने तत्वाचे राजकारण केले. पक्षात घेताना कोणालाही पारखूनच प्रवेश दिला. पण आता वेगळे दिवस आलेले आहेत. आपल्या नागपूरचे खासदार केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना विरोधी पक्षातील एका मोठ्या नेत्याने पंतप्रधान पदाचे निमंत्रण दिले. याचे कारण आपण समजून घेतले पाहिजे. नितीन गडकरी सर्व पक्षांना आपलेसे वाटतात. त्यांच्या मनात द्वेषभावना नाही. विकासाच्या कामात ते भेदभाव करीत नाहीत. त्यांच्या कल्पना, त्यांचे समाजातील सर्व वर्गाप्रती असलेले प्रेम यामुळे ते सर्वांनाच प्रिय आहेत. पण गडकरी यांनी आपला पक्ष कधीच सोडणार नाही, असे जाहीर करून निमंत्रण फेटाळले. यावरून स्वपक्षनिष्ठा कशी असते हे त्यांनी दाखवून दिले. पण असे अपवाद आता भारतीय जनता पक्षातही फारच कमी उरले आहेत. त्यामुळेच कितीही कलंकित असला, तरी पण तो निवडून येऊ शकतो हे दिसून आल्यावर आधी शिव्या घातलेल्या कोणालाही भारतीय जनता पक्षात प्रवेश मिळतो. हे आता दिसून येत आहे. त्यामुळेच बिट्टू सारखे अनेक तट्टू आपल्या अकलेचे दिवाळे वाजल्यासारखे बडबडत असतात. दुसऱ्या एकाने तर राहुल गांधीच्या हत्येची सुपारी दिली आहे. आपण सत्ताधारी पक्षात आहोत. तेव्हा अशी वक्तव्ये करणे किती घातक होऊ शकते. याची त्यांना कल्पनाही या बोल घेवड्यांना नाही. हेच आपले दुर्दैव आहे. ज्या दिवशी अशा प्रकारचे वक्तव्य करण्यात आले. त्याचे तात्काळ खंडन करण्या ऐवजी मूग गिळून बसणे योग्य वाटत असेल. तर या सर्व बोलभांड चवन्नीछाप नेत्यांना उभारी देण्यासारखेच आहे. संविधानाबद्दल वाह्यात बडबड केल्यामुळे अयोध्येची खासदारकी हरणाऱ्या पुढाऱ्यासारखी जी जी बांडगूळे या पक्षात असतील त्यांना त्यांना वेचून गप्प केल्याशिवाय देशाचे राजकारण कसे शुद्ध होईल, हेच आम्हाला कळत नाही. तिकडे अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार झाल्यावर अध्यक्ष बायडेन आणि उपाध्यक्ष कमला हॅरीस यांनी तात्काळ आपल्या संवेदना प्रकट केल्या. हा पोक्तपणा राहुल गांधींच्या बद्दल बोलताना का दाखविला जात नाही? अशा प्रकारच्या निंदनीय वक्तव्यामुळे राहुल गांधी यांचीच चर्चा जास्त होते. हे निदान वरिष्ठांना तरी कळले पाहिजे. तेव्हा अशा नंबरी नगांना ज्यांनी कृतघ्नतेची परिसीमा गाठली आहे. अशा सर्व लोकांच्या तोंडाला आता सुई दोऱ्याने शिवण्याची वेळ आलेली आहे. असे आम्ही म्हटले तर चुकीचे होईल काय?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वाचाळवीर जोरात!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

राज्यात विधानसभेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतशा सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोपांच्या फैरी झडत आहेत. एकमेकांवर तोंडसुख घेण्याची कोणतीच संधी राजकीय नेते सोडत नाही. आरक्षणासंबंधीच्या वक्तव्यानंतर केंद्र व राज्यातील सत्ताधा नेत्यांनी राहुल गांधी यांना घेरले असतानाच आता शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रक्षोभक विधान केले आहे. राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यांस ११ लाख रूपयांचे बक्षीस देवू, असे गायकवाड यांनी म्हटले आहे. तिकडे, भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनीही शरद पवार यांच्यावर शेलकी टीका केली आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रधानमंत्री मोदींवर मानसिक संतुलन बिघडल्याची टीका केली आहे. निवडणुकीच्या तोंडावर या वाचाळवीरांना अधिकच जोम चढला आहे.

## जीभ छाटणाऱ्यास ११ लाखांचे बक्षीस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१६:



आरक्षण रद्द करण्याची भाषा करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास ११ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची वादग्रस्त घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी सोमवारी केली आहे.

आमदार गायकवाड म्हणाले की, ▶▶पान ८ वर

## महाराष्ट्राला जातीयवादाचा कॅन्सर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६:



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राला जातीयवादाच्या कॅन्सरची लागण झाल्याची विखारी टीका भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी सोमवारी केली.

शरद पवारांनी 50 - 60 वर्षांत महाराष्ट्राला लुटण्याचे काम केले. त्यांच्यामुळेच ▶▶पान ८ वर

## त्यांचे मानसिक संतुलन बिघडले..

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६:



शिवसेनेचे नेते संजय राऊत पंतप्रधान मोदींवर निशाणा साधत म्हणाले की, त्यांचे डोके सडलेले आहे, त्यांचे मानसिक संतुलन ठीक नाही. याशिवाय त्यांनी निवडणूक आयोगावरही पक्षपाताचा आरोपही केला.

राऊत म्हणाले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आता काय बोलतील हे माहीत नाही. ▶▶पान ८ वर

## माझी खिल्ली उडवली गेली - पीएम मोदी

■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. १६:



गुजरात दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत समारंभाला हजेरी लावली. ते म्हणाले की, तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर मी पहिल्यांदाच गुजरातमध्ये आलो आहे. अनेकांनी माझी खिल्ली उडवली, पण मी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भूमीत जन्मलेला मुलगा आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

### सुटीची सूचना

आज मंगळवार दि. १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त दै. महासागरच्या कार्यालय व मुद्रण विभागास सुट्टी असल्यामुळे १८ सप्टेंबरचा अंक प्रकाशित होणार नाही. याबाबत वाचक, जाहिरातदार व एजंटांनी नोंद घ्यावी.

व्यवस्थापक

## ट्रम्प यांच्या हत्येचा दुसऱ्यांदा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि.१६:

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पुन्हा एकदा हल्ला झाला आहे. सीएनएननुसार, फ्लोरिडामधील पाम बीच काउंटीमध्ये ट्रम्प यांच्या आंतरराष्ट्रीय गोल्फ क्लबजवळ गोळीबार झाला. ट्रम्प सुरक्षित असल्याची माहिती सीक्रेट सर्व्हिसने दिली आहे.

या घटनेच्या तपासाची जबाबदारी एफबीआयकडे देण्यात आली आहे. ते या घटनेला "हत्येचा प्रयत्न" म्हणून हाताळत आहेत. संशयिताकडे बॅरल आणि गोप्रो कॅमेरा असलेली एके-47 सारखी रायफल होती.

रिपोर्टनुसार, जेव्हा गोळी झाडण्यात आली तेव्हा ट्रम्प 5 व्या होलजवळ गोल्फ खेळत होते. एका सीक्रेट सर्व्हिस एजंटने गोल्फ कोर्सच्या कुंपणातून रायफलसह हल्ला करणाऱ्या संशयिताला पाहिले. पोलिसांनी संशयित रौथला अटक केली आहे. रायन वेस्ली रौथ असे आरोपीचे नाव आहे. तो ट्रम्प यांच्यापासून 300 यार्ड दूर होता. त्यानंतर एजंटने त्याच्यावर गोळीबार केला.

## गायकवाड पोसलेल्या पाळीव प्राण्याप्रमाणे...

### काँग्रेसचा पलटवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६:

विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी संजय गायकवाड यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. आमदार संजय गायकवाड हे वेडे व्यक्ती आहेत. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोसलेल्या पाळीव प्राण्याप्रमाणे नेहमीच अशी वादग्रस्त विधाने करतात, असे ते म्हणालेत.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, आमदार संजय गायकवाड एक वेडे व्यक्ती आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोसलेल्या पाळीव प्राण्याप्रमाणे ते नेहमीच अशी वादग्रस्त विधाने करतात. त्यांनी राहुल गांधींची जीभ छाटण्याची भाषा करू नये. उलट आपण व आपला पक्ष कुठे आहे हे त्यांनी पाहावे. त्यांची राहुल गांधी यांचे नाव घेण्याचीही लायकी नाही. त्यांचे विधान हे सूर्याकडे पाहून थुंकण्यासारखे आहे. ती थुंकी त्यांच्याच तोंडावर पडेल. त्यानंतर त्यांचे काळवंडलेला चेहरा संपूर्ण महाराष्ट्र पाहील.

वडेट्टीवार पुढे म्हणाले, आगामी विधानसभा निवडणुकीत संजय गायकवाड यांची सत्तेची मस्ती व मस्तवाल भाषा जी भ्रष्टाचाराच्या पैशांतून आली आहे, त्यांनी अशी बेताल विधाने करणे बंद करावीत. स्वतःच्या औकातीत रहावे.

एका पक्षाच्या प्रमुख नेत्याची जीभ छाटण्याचे बेताल विधान करणाऱ्या संजय गायकवाड यांच्यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस कोणती कारवाई करतात याकडे आमचे लक्ष आहे. सरकारने त्यांच्यावर त्वरीत गुन्हा दाखल करून अटक करावी, असेही ते म्हणाले.



# आपत्कालीन स्थितीत 14 गावांत महापालिकेचीच धाव!

**नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १४ गावांच्या सहभागावरून व विकासकामांसाठी आगामी काळात लागणाऱ्या खर्चावरून विविध राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत असल्याचे चित्र असले तरी १४ गावांमध्ये आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास नवी मुंबई महापालिकेलाच धाव घ्यावी लागणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'ला दिली आहे. चौदा गावांना सहभागी करण्याच्या निर्णयावर 'तू-तू मैं-मैं'रंगले असले तरी आपत्कालीन स्थितीत महापालिकेला झटकता येणार नाही.

वगळलेली १४ गावे पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्याचा निर्णय २२ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला होता. या गावांना पुन्हा नवी मुंबईत सामावून घेतले असल्याने आमदार गणेश नाईक व शिवसेना शिंदे गट, उद्धव गट यांच्याकडून वादंग रंगल्याचे समोर आले आहे.

ग्रामविकास विभागाच्या मार्फतच हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती १४ गावांच्याबाबत जबाबदारी असलेले परिमंडळ उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी 'लोकसत्ता'ला दिली आहे. पालिकेने या गावांच्या कामकाजासाठी तिसरे परिमंडळ निर्माण केले आहे तसेच एका उपायुक्तांची निवड केली आहे. ही गावे सामावून घेताना खर्चाचा मोठा भुर्दंड पालिकेला पडणार असल्याने पालिकेच्या उत्पन्नातून कोणताही खर्च करू नये असा पवित्रा आमदार नाईक यांनी घेतला आहे. तसेच शासनाने महापालिकेला मोठा आर्थिक निधी उपलब्ध करण्याची मागणीही केली आहे. त्यामुळे १४ गावांबाबत नवी मुंबई महापालिकेला मोठी आर्थिक जबाबदारी पेलावी लागणार आहे. असे असले तरी या १४ गावांमध्ये कोणतीही आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी व नियंत्रणाची मोठी जबाबदारी पालिकेलाच पार पाडावी लागणार आहे. या गावांच्या स्वच्छतेबाबत पालिका अधिकाऱ्यांनी १४ गावांची पाहणी करून अगोदरच सुरू असलेल्या ५ कचरा वाहतूक गाड्या व २० साफसफाई कामगारांद्वारेच स्वच्छतेचे काम पार पाडले जात आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी फक्त भेट घेत स्वच्छतेबाबत सूचना देण्याचे काम केले आहे.

# दिवा, भांडर्लीची जमीन होणार कचरामुक्त ?

## कचरा भुमीवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार

**ठाणे, दि. १६ प्रतिनिधी**

दिवा आणि भांडर्ली परिसरातील कचराभुमी ठाणे महापालिकेने बंद केली असली तरी त्याठिकाणी कचऱ्याचे ढिग कायम असून या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यात २२ लाख मेट्रीक टनपैकी साडे आठ लाख मेट्रीक टन इतक्या कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावून ही जमीन कचरामुक्त करून पुर्वीप्रमाणे केली जाणार आहे.

राज्य शासनाने ठाणे महापालिकेला कचरा भुमीसाठी भिवंडी येथील आतकोली भागात जागा देऊ केली असून येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीसाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर डायघर येथेही कचऱ्यापासून वीज निर्मीती करण्याचा प्रकल्प उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित झालेला नसला तरी याठिकाणी कचरा वर्गीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. या दोन्ही ठिकाणी कचराभुमी होण्यापुर्वी पालिका प्रशासनाकडे हक्काची कचराभुमी नव्हती. यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणारा ९५० मेट्रिक टन कचरा दिवा भागात टाकला जात होता. येथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक क्षमतेचे प्रकल्प उभारले नाहीत म्हणून हरीत लवाद आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पालिकेला वांरवार नोटीसा येत होत्या.




या कचराभूमीमुळे परिसरात दुर्गंधी पसरण्याबरोबरच सातत्याने आगी लागण्याच्या घटना घडतात. त्यामुळे ही कचराभूमी बंद करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून आंदोलने केली होती. परंतु डायघर प्रकल्प कार्यान्वित होण्यास उशीर होत होता. त्यामुळे डायघर प्रकल्प सुरू होईपर्यंत शहराबाहेर म्हणजेच भांडर्ली भागात पालिकेने जागा भाड्याने घेऊन तिथे कचरा टाकण्यास सुरू केले होते. या कचराभुमीमुळे शेतीचे नुकसान होऊ लागले. यामुळे स्थानिकांनी कचराभुमीस विरोध सुरू केला. अखेर पालिकेने डायघर प्रकल्पाचे काम पहिल्यात सुरू करत भांडर्ली कचराभुमी बंद केली. असे असले तरी दिवा आणि भांडर्ली कचराभुमीवर कचऱ्याचे ढिग साचलेले आहेत. हे ढिग हटवून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने आता पाऊले उचलली आहेत. यासाठी पालिकेने निविदा काढल्या आहेत. या संदर्भात घनकचरा विभागाचे उपायुक्त मनिष जोशी यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला.

ठाणे महापालिका क्षेत्रातील जुन्या कचराभुमी व्यवस्थापनासाठी (लेगसी वेस्ट) मान्यता प्राप्त आणि अनुभवी निविदाकारांकडून पालिका करून घेणार असून त्यानुसार पालिकेने ही निविदा काढली आहे. दिवा आणि भांडर्ली कचराभुमीवर अंदाजे २२ लाख मेट्रीक टन कचरा आहे. पहील्या टप्प्यात त्यापैकी साडे आठ लाख मेट्रीक टन इतक्या कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावून ही जमीन कचरामुक्त करण्यात येणार आहे. तर, उर्वरित कचऱ्याचीही अशीच विल्हेवाट लावली जाणार आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली.

# 'स्वच्छता ही सेवा' अभियानात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाव्दारे 300 हून अधिक देशी झाडांचे वृक्षारोपण

**नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने प्राप्त निर्देशानुसार 14 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर 2024 या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा' साजरा करण्यात येत असून या अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यामधील 'एक पेड माँ के नाम' हा एक अभिनव उपक्रम सेक्टर 36, नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदानाजवळील उद्यानात संपन्न झाला.

याप्रसंगी विधानसभा सदस्य आ.श्री.गणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, माजी आमदार श्री.संदीप नाईक, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार, उद्यान विभागाचे उपआयुक्त श्री.दिलीप नेरकर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ 1 उपआयुक्त डॉ.अजय गडदे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ.संतोष वारूळे, अति.शहर अभियंता श्री.अरविंद शिंदे, नेरूळ विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. शशिकांत तांडेल, माजी नगरसेवक श्री.रविंद्र इथापे, स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन श्रीम.रिचा समित आणि इतर उपस्थितांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे या उपक्रमात लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या सहयोगातून 167 तृतीयपंथी नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत वृक्षारोपण केले.

आपल्या वडिलधा-यांच्या सन्मानार्थ झाड लावण्याची आपली परंपरा आहे, त्यानुसार मा.पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविला जात असल्याचा आनंद व्यक्त करीत आ.श्री.गणेश नाईक यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या



वतीने शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांप्रमाणेच वृक्षारोपणातून पर्यावरणासाठीही लौकिकाला साजेसे काम होत असल्याबद्दल आयुक्त व सर्व सहकारी, अधिकारी यांचे कौतुक केले. सध्याच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखणे महत्वाचे असल्याचे सांगत नवी मुंबई महानगरपालिका त्यादृष्टीने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी वातावरणातील बदलामुळे होणारे परिणाम थांबविण्याकरिता सध्याचे जागतिक तापमान वाढीचे प्रमाण लक्षात घेऊन सर्वांनी जागरूक होण्याची गरज असल्याचे स्पष्ट करीत वैयक्तिक, संस्थात्मक व सामाजिक अशा तिन्ही पातळ्यांवर प्रत्येक नागरिकाने आपली पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. वृक्षारोपण हा त्याचाच एक महत्वाचा भाग असल्याचे सांगत आयुक्तांनी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम आपले जीवन समृध्द करणा-या आईचे स्मरण करीत धरतीमातेलाही समृध्द करणारा उपक्रम असल्याचे सांगितले. पूर्वजांकडून आपल्याला खूप काही मिळालेले आहे, त्यामुळे पुढच्या पिढीसाठी सामाजिक दायित्व म्हणून हा वृक्षारोपणाचा उपक्रम महत्वाचा असल्याचेही ते म्हणाले. 'स्वच्छ भारत मिशन'ला 10 वर्षे पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करीत यामध्ये नवी मुंबईने नागरिकांच्या सक्रिय सहभागातून नेहमीच आघाडी घेतली असल्याचा विशेष उल्लेख त्यांनी केला.

शहरात पशूपक्ष्यांचा अधिवास वाढेल अशा 300 हून अधिक देशी वृक्षरोपांची यावेळी लागवड करण्यात आली. ज्यामध्ये जांभूळ, वड, पिंपळ, आंबा, फणस, मोहोगणी, आवळा, पेरू, चिक्कू, सीताफळ, करंज, अर्जुन, बकुळ, सीता, अशोक, काजू, आंबा, वड, पिंपळ, करंज आदी वृक्षारोपण करण्यात आले.

# पिस्तुलं विक्री करणारा डीलर पोलिसांच्या जाळ्यात 7 पिस्तूल 14 जिवंत काडतुसे जप्त



**पुणे, दि. १६ : प्रतिनिधी**

चिंचवड मध्ये पिस्तुलांची तस्करी करणाऱ्या सराईत गुन्हेगारासह इतर चार जणांना मालमत्ता विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. मध्यप्रदेशातून आणलेली पिस्तूल सराईत गुन्हेगार नवल झामरे हा पिंपरी- चिंचवड मध्ये आणून विकत असल्याचे निष्पन्न झाल आहे. पिंपरी-चिंचवडच्या मालमत्ता विरोधी पथकाने ७ पिस्तूल, १४ जिवंत काडतुसासह १६ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रदीप उर्फ अक्षय बाळासाहेब ढगे, सुरज अशोक शिवले, नवल वीरसिंग झामरे, कमलेश उर्फ डॅनी कानडे आणि पवन दत्तात्रय शेजवळ अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रदीप ढगे, सुरज शिवले आणि नवल वीरसिंग झामरे या तिघांना आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मालमत्ता विरोधी पथकाने ताब्यात घेतलं. याबाबत ची माहिती पोलीस कर्मचारी गणेश सावंत, हर्षद आणि सुमित देवकर यांना मिळाली होती. आरोपींकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडे तीन पिस्तूल आणि सात जिवंत काडतुसे मिळाली. याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात तिघांवर आर्म ऍक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायालयात हजर करून त्यांना पोलीस कोठडी घेण्यात आली. यादरम्यान, चौकशीत आरोपी झामरे हा मध्य प्रदेश मधून पिस्तुल आणून इतर आरोपींना विकत असल्याचे समोर आलं. झामरेने कमलेश कानडे मार्फत पवन शेजवळ याला देखील एक पिस्तुल आणि जिवंत काडतुस विकल्याच समोर आलं. तसेच झामरेकडे आणखी तीन पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसे मिळाली. एकूण कारवाई मध्ये ७ पिस्तूल १४ जिवंत काडतुसांसह १६ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी झामरे हा पिस्तुलांची तस्करी करत असल्याच तपासात निष्पन्न झाल आहे. पैकी, पवन शेजवळ याच्यावर घरपोडीचे पाच गुन्हे दाखल असून कमलेश उर्फ डॅनी कानडे यांच्या विरोधात मंचर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांची टीम पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी, गणेश सावंत, हर्षद कदम, सुमित देवकर, नितीन लोखंडे,आशिष बनकर, गणेश हिंगे यांनी केली आहे.

# गणेशोत्सव दरम्यान नेत्र चिकित्सा व महिलांना शिवण यंत्र वितरण



**भिवंडी, दि.१६ : प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा करताना सामाजिक भान बाळगून विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याने धामणकर नाका मित्र मंडळाचे कार्य इतर मंडळांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत ,संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील मंदिरांची प्रतिकृती गणेशोत्सव काळात बनवून भिवंडीकर नागरिकांना तिचे दर्शन घडवून आणत असल्याने त्यांची प्रशंसा सर्वच स्तरातून होत आहे.अशा शुभेच्छा माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिल्या आहेत.ते भिवंडी शहरातील एकात्मतेचा राजा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या वतीने गरीब गरजू महिलांना शिवणयंत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी माजी सभागृह नेते सुमित पाटील,

भाजपा सरचिटणीस विशाल पाठारे,राम माळी उपस्थित होते.तर संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली श्री भैरव सेवा समिती संचालित नेत्र चिकित्सालयाच्या सहकार्यांने मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मा वितरण शिबिराचे आयोजन गणेशोत्सव मंडपात करण्यात आले होते.भैरव सेवा समितीचे प्रमुख अनिल जैन,पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.बुशरा सय्यद,संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या नेत्र चिकित्सा शिबिरात १९७ रुग्णांची नेत्र चिकित्सा करण्यात आली.यापैकी १५० रुग्णांना मोफत चष्मा वितरीत करण्यात आले.तर या शिबिरात मोतीबिंदू झालेले पंधरा रुग्ण आढळून आले असून या रुग्णांची येत्या पंधरा दिवसात धामणकर नका मित्र मंडळ संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून दिल्ली जाणार असल्याची माहिती संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे.

# कारागृहातून बाहेर पडताच वाहन चोरीचे गुन्हे; दोन मोटारी, पाच दुचाकी जप्त

**पुणे, दि.१६ : प्रतिनिधी**

कारागृहातुन सुटका होताच वाहन चोरीचे गुन्हे करणाऱ्या चोरट्यांना कोरेगाव पार्क पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून दोन मोटारी, पाच दुचाकी असा दहा लाख ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अभिषेक शरद पवार (वय ३६, रा. गुरुवार पेठ), सुजीत दत्तात्रय कुंभार (वय ३६ रा. कोंढणपूर, खेड शिवापुर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अभिषेक पवार आणि सुजीत कुंभार यांची येरवडा कारागृहात ओळख झाली होती. जानेवारी महिन्यात जामीन मिळवून कुंभार कारागृहातून बाहेर पडला. पवार २ सप्टेंबर रोजी जामीन मिळवून कारागृहात बाहेर आला. पवारचा जामीन झाल्यानंतर तो कारागृहातून घरी गेला नाही. त्याने कोरेगाव पार्क भागातून एक दुचाकी चोरली. त्याने कुंभारशी संपर्क साधला. पवारने चोरलेली दुचाकी येरवडा कारागृहासमोर असलेल्या मोकळ्या जागेत लावली. कारागृहाच्या मोकळ्या जागेत एका पोलीस कर्मचाऱ्याने दुचाकी लावली होती. पोलीस कर्मचाऱ्याची दुचाकी चोरून पवार पसार झाला. पोलिसांनी तपास करून दोघांना अटक केली. त्यांच्याकडून पाच दुचाकी आणि दोन मोटारी जप्त करण्यात आल्या. पोलीस उपायुक्त स्मार्तन पाटील, सहायक आयुक्त दीपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली कोरेगाव पार्क पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रुणाल मुल्ला, पोलिस निरीक्षक चेतन मोरे, उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण, शांतमल कोळ्ळुर, विजय सातव, रमजान शेख, मयुर शिंदे, प्रविन पडवळ, संदीप जडर, राहुल वेताळ, राहुल मोकाशी यांनी ही कारवाई केली.

### पोलिसांना कसे सापडले

विधानभवनात मंत्र्याला भेटण्यासाठी आलेल्या एकाने मोटार लावली होती. पवार आणि कुंभारने त्यांना गाठले. तुम्ही चुकीच्या पद्धतीने मोटार लावली आहे.तुमच्या मोटारीमुळे अन्य वाहनचालकांना वाहने लावण्यास अडचण येत असल्याची बतावणी केली. मोटार नीट लावतो, असे सांगून दोघांनी मोटारचालकाकडून चावी घेतली. मोटार घेऊन दोघे जण पसार झाले. पुणे स्टेशन परिसरातून प्रवासी घेऊन दोघे जण मुंबईला गेले. दरम्यान, मोटार टोलनाक्यावरुन पुढे गेल्यानंतर मोटारमालकाच्या मोबाइल क्रमांकावर संदेश आला. त्याने पोलिसांकडे तक्रार दिली. खालापूर टोल नाक्याजवळ सापळ लावून पोलिसांनी पवार आणि कुंभार यांना पकडले.

# जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यास सेझ कंपनीची हरकत,पुढील सुनावणी 9 ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली

**उरण, दि. १६ : प्रतिनिधी**

महामुंबई सेझसाठी पेण, पनवेल आणि उरणमधील शेतकऱ्यांच्या खरेदी करण्यात आलेल्या जमिनी परत करण्याच्या निर्णयाला सेझ कंपनीची हरकत घेतली आहे. त्यामुळे न्यायालयाने सुनावणी ९ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली आहे. मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारीवर निर्णय घेण्याचा रायगड जिल्हा अधिकाऱ्यांना कोणताही अधिकार नसल्याचा दावा करून याप्रकरणी सेझ कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यामुळे रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी महामुंबई सेझग्रस्तांची सुनावणी आक्टोबरपर्यंत पुढे ढकलली असल्याची माहिती महामुंबई सेझग्रस्त समितीचे सल्लागार ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी दिली. महामुंबई सेझसाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याच्या निर्णयावर चार आठवड्यांत निर्णय देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बुधवारी (४) झालेल्या सुनावणीत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा पुढे ढकलली होती. त्यानंतर पुढील अंतिम सुनावणी बुधवारी (११) सप्टेंबर रोजी घेण्यात आली. मात्र आजच्या सुनावणीआधीच महामुंबई सेझ कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात याप्रकरणी सुनावणी अथवा निर्णय घेण्याचा कोणताच अधिकार रायगड जिल्हाधिकाऱ्यांना नाही. यामुळे सुनावणी व निर्णयाला स्थगिती देण्यासाठी याचिका कंपनीने उच्च न्यायालयात दाखल केली आहे. कंपनीच्या याचिकेवर उच्च न्यायालयानेही या प्रकरणाची सुनावणी २० सप्टेंबरपर्यंत तहकूब करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे महामुंबई सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याची सुनावणी ९ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली आहे.

# मित्राच्या पत्नीला धमकी देणारी महिला पोलीस निलंबित

**पुणे, दि.१६ : प्रतिनिधी**

मित्राच्या पत्नीला जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या पुणे पोलीस दलातील महिला पोलीस शिपायाला निलंबित करण्यात आले .अनघा सुनील ढवळे असे निलंबित करण्यात आलेल्या पोलीस शिपायाचे नाव आहे. ढवळेविरुद्ध कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. ढवळे कोथरूड वाहतूक विभागात नियुक्तीस होती. दोन महिन्यांपुर्वी ढवळेविरुद्ध गडहिंग्लज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. याबाबत ३१ वर्षीय महिलेने फिर्याद दिली होती. 'मी पुण्यातील स्थानिक आहे. माझी गुंडांबरोबर ओळख आहे. मी एक सामाजिक संस्था चालविते.

सामाजिक संस्थेच्या माध्यमातून काळा पैसा चलनात आणतो. आमचा संस्थेकडून नऊ कोटी रुपयांचा व्यवहार झाला. तुझ्या पतीला ४० ते ५० लाख रुपये मिळणार आहेत', असे ढवळेने महिलेला सांगितले होते. 'मी सांगेल तशी वागली नाही तर तुला ठार मारू', अशी धमकी ढवळने महिलेला दिली होती.ढवळेविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर तिची चौकशी करण्यात आली. त्यानंतर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी तिला पोलीस सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले.

# 'पीरिपा'ने केला संविधान विरोधी वक्तव्याचा निषेध

**नागपूर, दि. १६ : प्रतिनिधी**

अमेरिकेच्या दौऱ्यात राहुल गांधी सातत्याने भारताची बदनामी करण्याचा उद्योग करीत आहेत. अशातच राहुल यांनी देश हा सामाजिकदृष्ट्या प्रगल्भ झाल्यानंतर आपण आरक्षण संपविण्याचा विचार काँग्रेस करेल हे ठणकावून सांगितले. यातून राहुल गांधीची आरक्षण संपविण्याची गरळ हे काँग्रेसी मनोवृत्तीमधून स्पष्टपणे दिसून येत असल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी केला. राहुल गांधी हे संविधान विरोधी असल्याने त्यांच्या अशोभनिय वक्तव्याचा राज्याभर जोडे मारो आंदोलनातून पीपल्स रिपब्लिकन पार्टी करणार असल्याचेही जयदीप कवाडे यावेळी म्हणाले.

शनिवारी सीताबर्डी, आनंद नगर येथील पक्षाच्या केंद्रीय कार्यालयात पीरिपाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या नेतृत्वात राहुल गांधीच्या पोस्टर जाळून व जोडे मारून आंदोलन करण्यात आले. पीरिपातर्फे राहुल गांधीच्या गैरकृत्याचा तिव्र निषेध नोंदवितांना जयदीप कवाडे बोलत होते. आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश संघटक कपिल लिंगायत, प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, नागपुर शहर अध्यक्ष कैलास बोम्बले, जेष्ठ नेते अजय चव्हाण, विजय पाटील, कालिदास चरण मेश्राम, रवि बाणमारे, मुकूंद पाटील, राजु मसराम, दिलीप पाटील, कुशिनारा सोमंकुवर, सुमित डोंगरे, सत्यपाल भाजीपाले, डॅनी शामकुंवर, स्वप्निल महल्ले, पलाश थवरे, अफरोज सिद्दिकी यांच्यासह भीमसैनिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. प्रसिद्धी पत्रकाद्वारे बोलताना जयदीप कवाडे म्हणाले की, परदेशातून राहुल गांधीच्या विधानातून काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड झाला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधातील काँग्रेसी विचार हे दिसून आले आहे. विरोधी पक्षाची धुरा सांभाळणाऱ्या नेत्याकडून असे वक्तव्य हे त्यांची भविष्यातील योजना आरक्षणाला संपविण्याचे घाट असल्याचे स्पष्ट होत आहे. यापूर्वी गांधी परिवाराची परंपरा ही बाबासाहेबांच्या विचारांच्या विरोधी होती. त्याच घराण्याची परंपरा जपण्याचे काम राहुल गांधी करीत आहे. त्यांच्या मनातील हे विधान हे त्यांच्या पिढीला साजेसे आहे. संविधान निर्माते बाबासाहेबांनीच्या आरक्षणला संपविणारे खरे काँग्रेसी आहेत म्हणून आम्ही राहुल गांधीच्या या भविष्यातील प्रयत्नांना हानून पाडू असेही जयदीप कवाडे म्हणाले.

# महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी केली के.बी. रोडची पाहणी

**उल्हासनगर दि.१६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त विकास ढाकणे यांनी कल्याण बदलापूर रोडची पाहणी केली आहे . पाहणी करताना त्यांच्या सोबत अतिरिक्त . आयुक्त जमिर लेंगरेकर, डॉ . किशोर गवस, उपायुक्त डॉ. सुभाष जाधव, शहर अभियंता तरुण सेवकानी, नोडल अधिकारी तथा सहायक आयुक्त गणेश शिंपी, सहायक आयुक्त मनिष हिवरे व इतर अधिकारी कर्मचारी हे उपस्थित होते. पाहणी करतांना प्रशासक तथा आयुक्त यांनी के बी रोडवरील अतिक्रमणासह चांगल्या झांडाची निगा राखणे या सह रोड मधील दुभाजक तसेच रोड स्वच्छता याबाबत निर्देश दिले आहेत.

उल्हासनगर महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी के बी रोड ची पाहणी करताना छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार याची दुरुस्ती करणे, येथे असलेले कारंजे (Fountain) जंगली झाडे व अति वाढलेले गवत काढुन झेंडे, फलक, होर्डिंग, बॅनर व विद्युत केबल काढण्याच्या सुचना दिल्या असुन कल्याण बदलापूर महामार्गातील दुभाजकाची दुरुस्ती करुन, नव्याने रंगरंगोटी करावी तसेच दुभाजकामधील खराब झालेली झाडे काढून तेथे नवीन झाडे लावण्यात यावे. दरम्यान कल्याण बदलापूर महामार्गातील ठिकठिकाणी असलेले खड्डे महत्वाचे चौक येथे डांबरीकरण करुन सुस्थितीत करावे त्यांनतर तेथे चमर्मोप्लास्टिक पेंट द्वारे रेखांकीत करावे.रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत उभे असलेले वाहन, हातगाड्या व पानटप-या त्वरीत हटविण्यात याव्यात असे आदेश देवुन सदर रस्त्यावर असलेले वाहन वाशिंग सेंटर यांची पाणीपट्टी त्वरीत तपासून योग्य ती कार्यवाही करावी. सदर रस्त्यावरील ठिकठिकाणी असलेल्या कचराकुंड्या व इतरत्र कचरा त्वरीत स्वच्छ करावा व धूळीच्या ठिकाणी आवश्यक ती कार्यवाही करावी. दरम्यान छत्रपती महाराज प्रवेश द्वार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश द्वार तसेच रस्त्याच्या दुभाजकावरील विद्युत वाहिन्या (केबल) त्वरीत हटविण्यात यावे. सदर रस्त्यास बाधित विद्युत ट्रान्सफॉर्मर उचित ठिकाणी हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश आयुक्तानी दिले आहेत.

# पहिल्या टप्प्यात एनसी-काँग्रेसचे पारडे जड

पहिल्या टप्प्यात 18 सप्टेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील 24 जागांवर मतदान होणार आहे. त्यापैकी 16 जागा काश्मीरमधील, तर 8 जागा जम्मूमधील आहेत. पहिल्या टप्प्यात नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडी सर्वात मजबूत म्हणून उदयास येऊ शकते. 12-13 जागा जिंकू शकतात. भाजप आणि पीडीपी दुसऱ्या क्रमांकावर राहू शकतात. दोघांना 4-6 जागा मिळू शकतात. अपक्षांना 1-2 जागा मिळण्याची शक्यता आहे. दक्षिण काश्मीरमधून एनसी-काँग्रेस आघाडीला सर्वाधिक जागा मिळताना दिसत आहेत.

--------------

पहिल्या टप्प्यात दक्षिण काश्मीरच्या जागांवर निवडणूक होत आहे. येथे मेहबुबा मुफ्ती यांच्या पक्षाची पीडीपीवर मजबूत पकड आहे, मात्र या निवडणुकीत पीडीपी स्वतःच्या बालेकिल्ल्यात कमकुवत दिसत आहे. मेहबुबा मुफ्ती यांच्या पक्षाने सलग तीन वेळा जिंकलेल्या बिजबेहरा जागेवर निकराची लढत आहे.

कलम 370 हटवल्यानंतर आणि विकासाचे दावे करूनही काश्मीर खोऱ्यात भाजपच्या विजयाची शक्यता कमी आहे. पहिल्या टप्प्यात कोणत्याही जागेवर भाजपला दुसऱ्या क्रमांकावर येणे अवघड असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. जम्मूमधील पहिल्या टप्प्यातील 8 जागांपैकी भाजपला भदेरवाह, दोडा पश्चिम, रामबन आणि बनिहालमध्ये आघाडी मिळू शकते.

जम्मू-काश्मीरच्या स्थानिक पक्षांसाठी निवडणुकीतील सर्वात मोठा मुद्दा बेरोजगारी नसून कलम 370 मागे घेणे हा आहे. बेरोजगारी दुसऱ्या क्रमांकावर आहे. तथापि, राजकीय तज्ज्ञांच्या मते, कलम 370 निःसंशयपणे काश्मीरच्या लोकांच्या भावनांशी संबंधित आहे. पण त्याच्या परतीचा रोडमॅप काय असेल यावर चर्चा होत नाही.

जमात-ए-इस्लामीशी संबंधित अपक्ष उमेदवार काश्मीरमधील पहिल्या टप्प्यातील 16 जागांवर झालेल्या निवडणुकीत मजबूत स्थितीत आहेत. इंजिनीअर राशिद यांच्या अवामी इत्तेहाद पक्षाचे उमेदवारही तगडी स्पर्धा देत आहेत. अपक्ष उमेदवार एक ते दोन जागा जिंकू शकतात. जमात-समर्थित सयार अहमद रेशी हे कुलगाम जागेवर सीपीआय (एम) चे उमेदवार युसूफ तारिगामी यांच्या विरोधात लढत आहेत, ज्यांनी 28 वर्षे प्रत्येक निवडणूक जिंकली आहे.

उर्दू वृत्तपत्र कश्मीर उज्माचे वरिष्ठ पत्रकार बिलाल फुर्कानी म्हणतात, 'कलम 370 हा निःसंशयपणे लोकांच्या भावनांशी संबंधित मुद्दा आहे. त्याच्या परतीचा मुद्दा सर्वच स्थानिक पक्षांनी उपस्थित केला आहे. हे कसे होईल याचा कोणताही रोडमॅप नाही. तरीही सर्व स्थानिक पक्षांच्या जाहीरनाम्यात तो मुद्दा बनवण्यात आला आहे.

'राज्यत्वाचा मुद्दाही आहे. मात्र, वातावरण सुधारले तर राज्याचा दर्जा परत करता येईल, असे आश्वासन केंद्र सरकारने दिले आहे. अशा स्थितीत या विधानसभा निवडणुकीत जनतेशी निगडित मूलभूत प्रश्न दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर येतात.

राजकीय तज्ज्ञ अझहर हुसेन यांचेही असेच मत आहे. ते म्हणतात, 'अलीकडेच नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी विधानसभेत पक्षाचे सरकार बनवताच कलम ३७० वर ठराव आणणार असल्याचे सांगितले होते.' तथापि, या विधानावर एलजीने हेही स्पष्ट केले आहे की, तुम्ही असा ठराव आणला तरी त्याला काही अर्थ नाही. त्यामुळे कलम 370 हा निश्चितच मोठा मुद्दा आहे, मात्र या आधारावरच मतदान होणार आहे.

जम्मूमध्ये पहिल्या टप्प्यात 8 जागांवर मतदान होणार आहे. या 8 जागांवर कोणता पक्ष मजबूत आणि कोणता कमकुवत आहे. यावर आम्ही जम्मूचे राजकीय तज्ज्ञ प्रा. हरिओमशी बोललो. ते म्हणतात, 'भाजपला यावेळी 8 जागांपैकी 5-6 जागा मिळू शकतात. हद्दवाढीमुळे हिंदू मतदार संघटित झाले आहेत.

भाजपने जुन्या उमेदवारांच्या जागी नवीन उमेदवार उभे केले आहेत. याबाबत नाराजीही समोर आली आहे. अशा स्थितीत भाजपला धार कशी मिळणार? यावर प्रा. हरिओम म्हणतात, 'यामुळे सत्ताविरोधी घटक कमी झाला आहे. याचा फायदा भाजपला होणार आहे.

ज्येष्ठ पत्रकार बिलाल फुर्कानी म्हणतात, 'रामबन आणि बनिहालमध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसचे उमेदवारही लढत आहेत. युती असूनही दोघेही निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षांची मते कमी होतील. 'अशा परिस्थितीत पहिल्या टप्प्यात रामबन, भदरवाह, बनिहाल आणि डोडामध्ये भाजपची आघाडी असेल. पहिल्या टप्प्यात भाजपला जम्मू प्रदेशातून 3-4 जागा सहज मिळू शकतात. उर्वरित जागांवर नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेसचे उमेदवार विजयी होऊ शकतात.

काश्मीरमध्ये भाजपला किती जागा मिळतील? यावर प्रा. हरिओम म्हणतात, 'भाजपला पहिल्या टप्प्यात काश्मीरमध्ये एकही जागा मिळणार नाही. जामीनही जप्त होऊ शकतो. दक्षिण काश्मीरमध्ये पहिल्या टप्प्यात मतदान होत आहे. अभियंता राशिद तेथे ताकदवान सिद्ध होऊ शकत नाहीत कारण त्यांची पकड उत्तर काश्मीरमध्ये आहे. दक्षिण काश्मीरमध्ये एनसी-काँग्रेस सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष म्हणून उदयास येईल.

ज्येष्ठ पत्रकार बिलाल फुरकानी म्हणतात, 'पहिल्या टप्प्यातील बहुतांश जागा दक्षिण काश्मीरमध्ये आहेत. पीडीपी येथे मजबूत मानला जातो. खुद्द पीडीपीची सुरुवात दक्षिण काश्मीरमधून झाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत या भागातून पीडीपीला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे सरकारही स्थापन झाले. पीडीपीची आता तशी स्थिती नाही.

ते पुढे म्हणतात, 'पूर्वी कोणी 3 ते 4 हजार मतांच्या फरकाने जिंकला तर तो खूप मोठा मानला जायचा. तरीही अनेक जागांवर पीडीपी मजबूत आहे. इल्तिजा मुफ्ती यांची बशीर अहमद यांच्याशी स्पर्धा आहे. दोघांमध्ये चुरशीची स्पर्धा आहे. बशीर यांचे वडीलही तीन वेळा आमदार राहिले आहेत. लोकसभा निवडणुकीतही त्यांनी माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांचा पराभव केला आहे.

## जम्मू कश्मीर इलेक्शन









*2016 मध्ये पीडीपीने भाजपसोबत सरकार स्थापन केले होते. त्याचा प्रभाव आजही कायम आहे. जनतेचा कल नॅशनल कॉन्फरन्सकडे अधिक आहे. मात्र, अनेक जागांवर क्लोज फाइट आहे.*

**बिलाल फुर्कानी,**
**ज्येष्ठ पत्रकार**

'मुफ्ती मोहम्मद सईद, मेहबुबा आणि त्यांच्या पक्षाचे उमेदवार गेल्या अनेक निवडणुकांपासून या जागेवर सातत्याने विजय मिळवत आहेत. पहिल्या टप्प्यात नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला 8-10 जागा मिळू शकतात. पीडीपीला फक्त ५-६ जागा मिळतील. काश्मीर खो?्यात मतदान होत असलेल्या १६ जागांवर भाजपला जास्त फायदा मिळण्याची शक्यता कमी आहे.

### राजकीय पक्षांचे दावे

**नॅशनल कॉन्फरन्स:**

नॅशनल कॉन्फरन्सचे मुख्य प्रवक्ते इम्रान यांच्या म्हणण्यानुसार, कलम ३७० आणि बेरोजगारीचे मुद्दे ठळकपणे मांडण्यात आले. ते म्हणतात, 'आमच्यासाठी सर्वात मोठा प्रश्न म्हणजे बेरोजगारी आणि महागाई. येथे बेरोजगारीचा दर सुमारे 23% आहे. आम्ही जाहीरनाम्यात 1 लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले आहे. यासोबतच 200 युनिटपर्यंत मोफत वीज दिली जाणार आहे. महिलांसाठी मोफत बससेवाही देणार आहे.

इम्रान म्हणतात, 'आमचे स्टार प्रचारक सतत प्रचार करत आहेत. पहिल्या टप्प्यात आम्ही बहुतांश जागा जिंकू. जम्मूमध्येही नॅशनल कॉन्फरन्सला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तिथून आम्ही भाजपला चकित करणार आहोत. आमचा पक्ष प्रत्येक जागेवर प्रचार करत आहे.

इम्रान पीडीपीला मोठे आव्हान मानत नाहीत. ते म्हणतात, 'आता लोकांना समजले आहे की नॅशनल कॉन्फरन्स, काँग्रेस आणि इतर पक्षांची आघाडीच भाजपचे ध्रुवीकरणाचे राजकारण थांबवू शकते. यावेळी पीडीपीची कामगिरी आजपर्यंतची सर्वात वाईट असेल.

पहिल्या टप्प्यात जम्मूच्या ३ जागांवर काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार आमनेसामने आहेत. इम्रान म्हणतात, 'या निवडणुकीत काही ठिकाणी काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स या दोन्ही पक्षांचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत.'

'खरे तर तिथल्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये एकाही सामान्य उमेदवाराबाबत निर्णय होऊ शकला नाही. मात्र ज्या जागांवर दोन्ही पक्षांचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तिथे आम्ही बलवान आहोत. कोणताही पक्ष विजयी झाला तरी युतीचा भाग राहील. अशा प्रकारे आपल्याला फायदाच होईल, नुकसान होणार नाही.

**पीडीपी:**

विधानसभा निवडणुकीतील जागांच्या लक्ष्याबाबत पीडीपीमध्ये मंत्री राहिलेले अब्दुल गफार सोफी म्हणतात, 'येथे १० वर्षांनंतर निवडणुका होत आहेत. लोकसभा निवडणुकीपासून आमची तयारी सुरू आहे. निवडणुकीत प्रत्येक जागेवर लढणे हे आमचे काम आहे. सर्वच जागा जिंकणे हे प्रत्येक राजकीय पक्षाचे लक्ष्य असते. हे आमचेही लक्ष्य आहे. 'जेव्हा कलम 370 हटवण्यात आले तेव्हा जम्मूच्या लोकांनी सर्वाधिक आनंद साजरा केला. आज त्यांना पश्चाताप होत आहे. यामुळे त्यांचा रोजगार बुडाला आहे. पूर्वी येथे बाहेरून कोणीही कामाला येत नव्हते. येथील लोकांना रोजगार मिळत असे. आज प्रत्येक विभागात बाहेरून लोक येत आहेत.

'भाजपला आता जम्मूमधूनही नुकसान सोसावे लागत आहे. काश्मीरमध्ये भाजपने पाय रोवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. 'येथे १ लाख पदे रिक्त आहेत. सरकार आल्यास लगेच भरू. या पदांसाठी ३ महिन्यांत जाहिराती काढल्या जातील. ९ महिन्यांत सर्व जागा भरल्या जातील. भरमसाठ वीजबिल हाही येथे मोठा प्रश्न आहे. याबाबतही आम्ही सांगितले आहे की, आम्ही प्रत्येक घरात 200 युनिट मोफत वीज देऊ. येथील स्मार्ट मीटर प्रणाली संपवणार. पाणी करही घेणार नाही.

**काँग्रेस :**

काश्मीरमधील डोरू येथील काँग्रेसचे उमेदवार आणि माजी मंत्री गुलाम अहमद मीर म्हणतात, 'विधानसभा निवडणुका ५ वर्षांपूर्वी व्हायला हव्या होत्या, पण तसे झाले नाही. 5 ऑगस्ट 2019 रोजी भाजपने घेतलेल्या निर्णयामुळे देशाची दिशाभूल झाली.

'जम्मू-काश्मीरला पुढे नेण्यात काही अडथळे होते, ते दूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या मते हे अडथळे होते, पण लोकांच्या मते या भावना होत्या. भाजपने येथील जनतेच्या भावनांशी खेळ केला. कलम ३७० व्यतिरिक्त बेरोजगारी आणि महागाई हे मोठे प्रश्न आहेत. येथे दुकानदार, शेतकरी, तरुण सर्वच चिंतेत आहेत.

नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीचे गुलाम अहमद मीर म्हणतात, 'लोकसभा निवडणुकीत एकत्र निवडणूक लढवण्याचा परिणाम तुम्ही पाहिलाच असेल. या विधानसभा निवडणुकीतही युतीला पुरेपूर फायदा होणार आहे. पीडीपीबद्दल ते म्हणतात, 'यावेळी पीडीपी केवळ आपल्या कुटुंबासाठी निवडणूक लढवत आहे. त्यांच्याकडे आता काहीच उरले नाही. पहिल्या टप्प्यात एनसी-काँग्रेस आघाडीला सर्वाधिक जागा मिळतील.

**भाजप :**

जम्मू-काश्मीरमधील भाजपचे प्रवक्ते अभिजीत जसरोटिया म्हणतात, 'आमचे लक्ष्य बहुतांश जागा जिंकण्याचे आहे. मात्र, या आकडेवारीबाबत अद्याप स्पष्टपणे काहीही सांगता येणार नाही. आम्ही सर्व जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.अभिजीत जसरोटिया म्हणतात, 'जम्मूच्या लोकांसाठी सगळे सारखेच आहेत. अभियंता रशीद तुरुंगात राहिले किंवा तुरुंगातून बाहेर आले तरी फरक पडणार नाही. पीडीपीच्या लोकांनीही हेराफेरी केली आहे. आम्ही एकाही व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने काम दिलेले नाही.

जम्मू-काश्मीरमध्ये बेरोजगारी ही मोठी समस्या आहे. तरुण चिंतेत आहे. येथे ना सरकारी नोकऱ्या उपलब्ध आहेत, ना खाजगी क्षेत्राने नोकऱ्या देण्यासाठी पुरेशी प्रगती केलेली आहे. येथील प्रत्येक तरुणाला ही समस्या भेडसावत आहे. पीएचडी करणारेही घरी बसले आहेत. परिणामी तरूणाच्या मनाज कमालीचा राग आहे.

एकूणच जम्मू काश्मिरची सत्ता हस्तगत करण्यासाठी येथे लढणारे सगळे पक्ष आतूर झाले आहेत. भाजपा येथे कमाल करेल, असे दिसत नाही.

●●●●●●●●●

# : महिलांचा मान सन्मान : लोकशाहीची आन-बान-शान!

**[जागतिक लोकशाही सप्ताह विशेष.]**

लोकशाही हे एक सार्वत्रिक मूल्य आहे. ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला विचार स्वातंत्र्य प्राप्त होते व तो सार्वजनिक बंधने पाळीत मुक्तपणे आपले जीवन जगू शकतो. आपल्या हक्काची मागणी करीत असताना, नागरिकाने आपल्या कर्तव्याचे पालन केले तर लोकशाही अखिल मानवतेला हितकारक ठरते. प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांची जाणीव करून देणे हा आजच्या विश्व लोकशाही दिवसाचा हेतू साध्य झाला तरच अब्राहम लिंकन यांनी म्हटल्याप्रमाणे, "लोकांनी लोकांसाठी, लोकांकरवी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही," हे खरे ठरेल.

------------------

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी किंवा अडचणींना तत्परतेने न्याय मिळण्याची शासकीय यंत्रणा म्हणजे 'लोकशाही दिन' होय. हा लोकशाही दिन जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालय स्तरावर राबविण्यात येत असतो. जिल्ह्याचा लोकशाही दिन हा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी होत असतो. कार्यपद्धती सुलभ व्हावी यासाठी तालुकास्तरावरही लोकशाही दिन राबविण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

कारण भारतीय संविधानात उल्लेखित न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता व ऐक्य ही मूलतत्वे लोकशाही राज्याची आधारस्तंभे असतात. अशा लोकसत्ताक राज्याला इंग्रजीत 'डेमोक्रसी' हा प्रतिशब्द आहे.

तो ग्रीक शब्द 'डेमोज' म्हणजे लोक आणि 'क्रेटीन' म्हणजे राज्य करणे, यावरून अपभ्रंशित झाला आहे. लोकांनीच राज्य करण्याची प्रथा खिस्तपूर्व सहाव्या शतकात ग्रीकांनी सुरू केली होती. समानता आणि स्वातंत्र्याद्वारे सार्वजनिक जीवनात शांती पसरावी हा लोकशाहीचा हेतू असतो. त्यामुळे, सार्वजनिक कामकाजात नागरिकांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार लाभलेला असतो.

मानवी हक्क अबाधित राखून, त्याचे संवर्धन करणे हे लोकशाहीचा तो मुख्य हेतू असतो. त्यासाठी लोकांना नागरी व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजवावी लागते. लिंग, जात, धर्म या सवार्पेक्षाही 'मानवता महान' हेच लोकशाहीचे सूत्र असते. महिलांच्या सहभागाने तर लोकशाहीची शान वाढते. परंतु, लोकसंख्येत अर्धा वाटा असूनही जगातल्या लोकसभांत त्यांचा सहभाग अल्पसा आहे. तो वाढावा म्हणून देखील आजच्या दिवसाची जागृती आहे.

सन २००७ सालच्या १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रकूलच्या सर्वसाधारण सभेत या जागतिक लोकशाही दिनाची घोषणा झाली. तेव्हापासून हा दिवस नियमितपणे साजरा करण्यात येऊ लागला आहे. त्यामागे एक पार्श्वभूमी होती.

फर्निनंड मार्कोस या फिलीपिनमधल्या हुकूम शहाची २० वर्षांची सत्ता तिथल्या जनशक्ती क्रांतीदलाने उलथून पाडली. तेव्हा तेथील नवनियुक्त राष्ट्राध्यक्ष कोसाझोन अक्विनो यांच्या अध्यक्षतेखाली सन १९८८ साली एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती.

अस्तित्वात असलेल्या व नव्याने उदयास आलेल्या प्रजासत्ताक राज्याच्या तत्त्वपूर्ण नियमावलीची प्रतिष्ठापना करणे, हा या परिषदेचा हेतू होता.

या परिषदेच्या कतार व दोहा येथे भरलेल्या सभेत लोकशाहीच्या हितार्थ राष्ट्रकुलाने पुढाकार घ्यावा, याचा पुनरुच्चार झाला. पुढे सन १९९७च्या सप्टेंबरमध्ये आंतर-लोकसभा संघटनेने लोकशाही मूल्याचा उद्घोष केला आणि राष्ट्रकूलाला जागतिक लोकशाही दिन जाहीर करावा लागला होता.

आंतरराष्ट्रीय लोकशाहीदिनाच्या निमित्ताने जगातील सर्व सरकारांना मी असे आवाहन करतो की, त्यांनी जनतेच्या मुलभूत हक्कांचा आणि अर्थपूर्ण व सक्रिय सहभागाचा आदर करावा; ते हक्क आणि सक्रिय सहभाग प्रत्यक्षात आणण्यासाठी अथक परिश्रम घेत असलेल्यांना मी मानाचा मुजरा करतो !ह्व असे उद्गार संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी काढले होते.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय लोकशाहीदिनाच्या निमित्ताने, लोकशाही म्हणजे जनतेचा आवाज या घोषणेचा आपण पुनरुच्चार केला पाहिजे. सर्वसमावेशकता, समान वागणूक आणि लोकसहभाग यांच्याद्वारे अस्तित्वात आलेली लोकशाही व्यवस्था शांततेची, शाश्वत विकासाची आणि मानवी हक्कांची पायाभरणी करते. मानवी अधिकारांच्या वैश्विक घोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणे, 'जनतेची इच्छा हाच कोणत्याही शासनाचा पाया असावा' (कलम २१.३) या संकल्पनेतून विविध राष्ट्रांमध्ये संविधान निर्मितीच्या प्रक्रियांना चालना मिळाली आहे.

त्याचबरोबर लोकशाही मूल्यांना आणि तत्वांना जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देण्यामध्येही वरील कलमाचे मोठे योगदान राहिले आहे. मानवी हक्कांचे संरक्षण आणि त्या हक्कांची प्रभावी अमलबजावणी, यांसाठी नैसर्गिक वातावरणही लोकशाहीमुळेच तयार होऊ शकले आहे.

वास्तविक पाहता लोकशाही हा दुहेरी मार्ग आहे. नागरी समाज आणि राजकीय वर्ग या दोहोंमधील निरंतर संवादातूनच खरीखुरी लोकशाही अस्तित्वात येत असते. त्यामुळे राजकीय निर्णयांमध्ये या संवादांचे प्रतिबिंब उमटणे आवश्यक असते.

जनतेचा राजकीय प्रक्रियेत सहभाग असणे, त्यांच्या नागरी स्वातंत्र्याचा अवकाश रुंदावत जाणे व सामाजिक सुसंवाद वाढीस लागणे, ही त्रिसुत्री उत्तम शासनव्यवस्थेचा पाया असते. जागतिकीकरणाची गतिमान प्रक्रिया व विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती यांच्यामुळे यावर शिक्कामोर्तबच झाले आहे.

मात्र जगभर नागरी स्वातंत्र्याचा अवकाश मोठ्या प्रमाणात आकुंचन पावत आहे. शिवाय नागरी समाजाला राजकीय प्रक्रियेत सक्रिय राहणे दिवसेंदिवस अवघड होऊ लागले आहे. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी लढणारांवर हल्ले होऊ लागले आहेत.

लोकशाही प्रक्रियेत महिलांना प्रतिनिधीत्व मिळू देण्यात अडचणी निर्माण केल्या जात आहेत. पत्रकारिता या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभात हस्तक्षेप होत आहेत.

अनेक पत्रकारांना तर हिंसेलाही सामोरे जावे लागत आहे. ही तितकीच लोकशाही मूल्यांना कलंकित करणारी लाजिरवाणी गोष्ट आहे, हे वेगळे सांगणे न लगेच!

!! सर्व देशप्रेमी बंधुभगिनींना आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या सप्ताहभर हार्दिक शुभेच्छा !!



**एन. के. कुमार गुरूजी**
**भारताच्या वैभवशाली इतिहासाचे गाढे अभ्यासक व साहित्यिक.)**
**रामनगर, गडचिरोली.**
**७७७५०४१०८६.**

●●●●●●●●●

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता.

पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती.

या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले.

स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला.

मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सांयकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या.

भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला. तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो.

मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

●●●●●●●●●

# ऐन तारुण्यात हृदय कमजोर?

एकेकाळी हृदयाचा आजार केवळ वृद्धांना व्हायचा. परंतू अलिकडील आपले रहाणीमान बदल्याने वाढता ताण-तणाव, बैठी कामाची शैली यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्याने ऐन तारुण्यात हृदयविकाराचे आजार होऊ लागले आहेत.

गेल्या दशकात कमी वयाच्या तरुणाचे हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाले आहेत. अवघ्या तिशीत हार्ट सर्जरींची वेळ येत आहे. 30 ते 35 वयात बायपास सर्जरी करणाऱ्यांची संख्या वाढली असून हे प्रमाण 30 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. परंतू कमी वयातच हृदय कमजोर का होत आहे. तिशीतच का बायपास सर्जरीची वेळ का येत आहे. यापूर्वी 50 वा 60 या वयात बायपास सर्जरीची व्हायची आता तिशीतच ही वेळ येत असल्याने जर विमा नसेल तर कुटुंबच आर्थिक संकटात सापडत आहे.



हृदयाला रक्त पुरविणाऱ्या रक्त पुरविणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज तयार झाल्यानंतर बायपास सर्जरीचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात असतो. हार्ट अटॅक आल्यानंतर किंवा हार्ट ॲटॅकच्या धोक्यापासून वाचण्यासाठी डॉक्टर बाय पास सर्जरीचा सल्ला देतात. हार्टमधील नसांमध्ये ब्लॉकेज कोलेस्ट्रॉलमुळे देखील होत असतो. तसेच रक्ताची गुठली झाल्याने देखील हृदयाचा रक्त पुरवठा बंद पडू शकतो. त्यामुळे बायपास सर्जरीचे प्रमाण खूपच वाढले आहे.

### तिशीत हार्ट फेलचे प्रमाण वाढले

जेवणाच्या वाईट सवयी आणि बिघडलेली जीवनशैली यामुळे देखील हृदयासंबंधित आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे राजीव गांधी हॉस्पिटलचे कार्डीओजी विभागाचे डॉ.अजित कुमार यांनी म्हटले आहे. गेल्या तीन वर्षांत तिशीत हार्ट ॲटॅक आणि हार्ट फेल होण्याचे प्रमाण खूपच वाढले आहे.कोरोना काळानंतर यात जास्त संख्या वाढली आहे.त्यामुळे कमी वयात बायबास सर्जरी करावी लागत असल्याचे डॉ. अजित कुमार यांनी म्हटले आहे.

बदलती जीवन शैली, व्यायामाचा अभाव आणि धूम्रपान आणि दारुचे व्यसन यामुळे हृदय विकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अलिकडे तिशीत हार्ट ॲटॅक येण्याचे प्रमाण खूपच वाढल्याचे गुरुग्राम येथील नारायणा हॉस्पिटलचे प्रोग्रॅम हेड कार्डियक सायन्सेसचे डॉ. हेमंत मदान यांनी म्हटले आहे.

### तक्रारींकडे दुलर्क्ष करु नये

मानसिक तणाव, अपुरी झोप याचा देखील हृदयावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे हृदय विकाराचे प्रमाण वाढले आहे. हार्टच्या आजाराविषयी लोकांमध्ये जागरुकता नाही. छातीत दुखू लागल्यावर अचानक धाप लागण्याच्या तक्रारीकडे लोक दुर्लक्ष करतात.

लोकांना गॅसेस किंवा एसिडीटीचा त्रास वाटतो. परंतू याकडे दुर्लक्ष करु नये असे दिल्लीच्या आरएमएल हॉस्पिटलमध्ये कार्डिओलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ.तरुण कुमार यांनी म्हटले आहे.

कमी वयात हार्ट अटॅक येण्याची कारणासाठी ब्लड प्रेशर देखील जबाबदार आहे. जामा जर्नलच्या साल 2021मधील एक संशोधनात म्हटले आहे की भारतात चार पैकी एका व्यक्तीला ब्लड प्रेशरच्या आजाराने ग्रस्त आहे. यातील 30 टक्के लोक कमी वयाचे आहेत.

### हृदयविकारापासून कसे दूर राहाल

शुगर लेव्हल नियंत्रणात राखा, आहाराच्या वाईट सवयी सुधारा, ताण-तणापासून दूर राहा, दररोज व्यायाम करा.

●●●●●●●●●

## अशोकायन

### निर्माल्य रथ

देवपूजेचे निर्माल्य
फेकू नये नदीत
जमा करून ठेवावे
टाका शेतामध्ये मातीत ..

जल प्रदुषणाला तर
बसेलच आळा
शेतीचा पोत ही सुधरेल
हा नियम पाळा ...!

पुजेच्या निर्माल्याचे
करण्या योग्य विसर्जन
निर्माल्य रथाची संकल्पना
गावात राबवूया सर्वजण..!

प्राप्त स्थिती स्विकारणे
हेच आहे आपुल्या हाती
धैर्य संयम आशावाद
जीवन जगण्या स्फुर्ती देती . . !



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# मी बैलासारखा काम करेन, काँग्रेस खासदाराचे आश्वासन

■ महासागर प्रतिनिधी,
**गोंदिया, दि. १६** :आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. मेळावे, सभा, दौरे आणि विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याकरिता सर्वपक्षीय नेते पायाला भिंगरी लावल्यासारखे मतदारसंघ पिंजून काढत आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी विदर्भावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.



गोंदियातील सर्कस ग्राउंडवर शुक्रवारी काँग्रेसचा महामेळावा पार पडला. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार मंचावर उपस्थित होते. या मेळाव्यात काँग्रेस खासदाराने केलेले एक वक्तव्य उपस्थितांमध्ये हशा पिकवून गेले.

विशेष म्हणजे, हे खासदार दोन दिवसांपूर्वीदेखील चर्चेत आले होते. भंडारा जिल्ह्यातील पूरस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्यांचे प्रचंड नुकसान झाले. या नुकसानीची आणि पूरग्रस्त भागांची पाहणी करताना याच खासदारांनी केलेले कृत्य प्रचंड गाजले. तुमसर तालुक्यातील एका गावात खासदार महोदयाला सोशल मीडियावर स्वत:ची पब्लिसिटी करण्याची हौस जडली. मग काय, खासदारांनी चक्क कारच्या बोनेटवर बसून पूरग्रस्त भागाची पाहणी केली. खासदारांच्या या स्टंटबाजीचा त्यांच्या कार्यकर्त्याने व्हीडिओ तयार केला आणि तो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. भंडारा-गोंदिया जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात या व्हीडिओची चर्चा झाली. यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली. या प्रकरणाची शाई अद्याप वाळली नसताना हेच खासदार महोदय पुन्हा एकदा आपल्या वक्तव्यामुळे चर्चेत आले आहे.

**जनतेला आश्वासन देताना स्वत:लाच दिली उपाधी**

काँग्रेसच्या महामेळाव्यात मंचावर उपस्थित नेत्यांना आणि जनतेला एक आश्वासन दिले. तीन महिन्यांआधी खासदार झालेल्या या महोदयांनी आपले संपूर्ण भाषण कागदावर लिहून आणले होते. त्यातील एकेक शब्द त्यांनी वाचून दाखवला. काँग्रेस पक्षश्रेष्ठींना आणि जनतेला आश्वासन देताना त्यांनी स्वत:लाच बैलाची उपाधी देऊन टाकली.

**नेमकं म्हणाले तरी काय?**

स्वत:ला बैलाची उपाधी देणारे हे काँग्रेसचे खासदार आहेत डॉ. प्रशांत पडोळे. खासदार पडोळे या महामेळाव्यात म्हणाले, मी काँग्रेस पक्षश्रेष्ठी आणि उपस्थित जनसमुदायाला या बाबीची हमी देऊ इच्छितो की, काँग्रेस संघटन वाढविण्याकरिता आणि गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील समस्या सोडवून आपला मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्याकरिता, वर्षातून फक्त एक दिवस पूजल्या जाणाऱ्या आणि वर्षभर शेतकऱ्यासोबत शेतात राबणाऱ्या बैलाप्रमाणे वर्षातील दिवस काम करेन. त्यांच्या या वक्तव्यामुळे काँग्रेस नेत्यांसह उपस्थितांत एकच हशा पिकला.

**वडेट्टीवारांनी आणखी एका नेत्याला बैल संबोधले!**

खासदार प्रशांत पडोळे यांच्यानंतर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पडोळे यांच्याच शब्दाला पकडून आपल्या भाषणाला सुरुवात केली. खासदार पडोळे यांच्या सोबतीला आम्ही आणखी एक बैल दिला आहे. त्यांचे नाव आहे, गोपालदास अग्रवाल. या बैलजोडीवर गोंदिया-भंडारा जिल्ह्यांच्या विकासाची जबाबदारी आम्ही टाकली आहे. बैलजोडी काँग्रेस पक्षासाठी काही नवीन नाही, ती आमच्या पक्षाची जुनीच निशाणी आहे. या बैलजोडीच्या प्रयत्नांतून आम्ही गोंदिया-भंडारजिल्ह्यातील सातही जागा जिंकू, असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

आपल्या आगळ्यावेगळ्या वक्तव्य आणि कृत्यांमुळे खासदार डॉ. प्रशांत पडोळे गोंदिया-भंडारा जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात विख्यात होत चालले आहेत. याचबरोबर विजय वडेट्टीवार यांनी गोपालदास अग्रवाल यांनाही बैलाची उपाधी दिल्याने त्याचीही चर्चा जोरात सुरू आहे.

# कायद्याचे भान ठेवले तर शांतता अबाधित राहते:आमदार संजय रायमूलकर

■ महासागर प्रतिनिधी,
**मेहकर, दि. १६ :** हिंदू-मुस्लिम बांधवांनी मानवतेच्या भावनेची जपणूक करण्यासाठी एकत्र येऊन सण उत्सव साजरी करावेत. शांततेत उत्सव साजरे करण्याची इथली परंपरा नागरिकांनी पुढे सुरू ठेवावी. नागरिकांनी कायद्याचे भान ठेवले तर शांतता व सुव्यवस्था आपोआप अबाधित राहते, असे प्रतिपादन आमदार संजय रायमूलकर यांनी केले.




मेहकर येथे आज ११ सप्टेंबर रोजी के व्ही प्राइड सभागृहात आयोजित गणेशोत्सव, ईद ए मिलाद शांतता समितीच्या मेहकर, लोणार तालुका विभागीय बैठकीत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलिस अधीक्षक महामुनी, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, बाजार समिती सभापती माधवराव जाधव, राजेंद्र पळसकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. गणेश मंडळांनी मिरवणूक शांततेत व वेळेत पार पाडावी, कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही , सलोख्याचे वातावरण बिघडणार नाही, याची सर्व धर्मीयांनी काळजी घ्यावी, असे आवाहन करून आमदार संजय रायमूलकर यांनी शहरातील तीन गणेश उत्सव मंडळांना हजार रुपये, हजार, हजार रुपये असे तीन गणराया पुरस्कार देण्यात येतील अशी घोषणा केली. यावेळी पोलिस अधीक्षक विश्व पानसरे म्हणाले की, मिरवणुकांमध्ये संयम बाळगावा. नियोजित वेळेत मूर्तींचे विसर्जन करावे व डीजेचा आवाज ७५ डेसिबल पेक्षा कमी ठेवावा. ढोल ताशे, लेझीम आदी परंपरागत वाद्यांचाच मिरवणुकीत वापर करावा. रासायनिक पदार्थयुक्त गुलालाचा वापरू नका, असे आवाहन केले. त्यानंतर महामुनी ,नसीम खान, खंडू सवडतकर, प्रा. आशिष रहाटे, राजेंद्र पळसकर यांनी आपले विचार व्यक्त केले. बैठकीला मेहकरचे ठाणेदार राजेश शिंगटे, डोणगावचे अमर नागरे , जानेफळचे आदिनाथ मोरे, लोणार येथील मेहत्रे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णा हावरे यांनी तर संदीप पाटील यांनी आभार मानले.

# बापरे! सव्वा लाख नागरिकांची सुरक्षा केवळ १०० पोलिसांवर

■ महासागर प्रतिनिधी,
**बल्लारपूर, दि. १३ :** येथील पोलिस ठाण्यांतर्गत २२ गावांमधील सुमारे १ लाख २१ हजार नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी ही केवळ १०० पोलिस अधिकारी, कर्मचारी सांभाळत आहेत. यामुळे सुरक्षात्मक उपाययोजनांमध्ये अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, शहर व गावांमध्ये सुरू असलेले जुगार, मटका, अवैध दारू, गौण खनिजांची वाहतूक रोखण्यास अडथळे निर्माण होत आहेत.




सध्या ठाण्यात एक पोलिस निरीक्षक, तीन सहायक पोलिस निरीक्षक, ३ पोलिस उपनिरीक्षक व ९० च्या जवळपास पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, तालुक्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या लोकसंख्येसाठी ही संख्या अपुरी आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे इतर अडचणींचा सामना पोलिस ठाण्याला करावा लागत आहे. गेल्या पाच महिन्यांपासून शहराच्या महत्त्वपूर्ण चौकातून ट्राफिक पोलिस दिसेनासे झाले आहेत. पोलिस चौक्या बंद आहेत, त्या उघडण्याचा प्रयत्न सुरू आहे. रात्रीची गस्त कमी प्रमाणात होते. पोलिसांची अपुरी संख्या असल्यामुळे पोलिसांना ठाण्यात जास्त वेळ द्यावा लागतो. बल्लारपूर पोलिस ठाण्यांतर्गत चार बिट, दोन आरोग्य व ग्रामीण रुग्णालय, सहा महापुरुषांचे पुतळे, १८मशीद, १३ चर्च व ३१ मंदिरांचा समावेश आहे. त्याचबरोबर ठाण्यापासून २८ किलोमीटर एवढ्या लांब अंतरावर असलेल्या हद्दीत २२ गावे आहेत. या गावांतील१लाख २० हजार २६४ लोकांच्या संरक्षणाची जबाबदारी जवळपास १०० पोलिस कर्मचारी पाहतात. उत्सवासाठी, गस्त घालण्यासाठी हे कर्मचारी कमी पडतात.

**असे आहे पोलिस ठाण्यातील मनुष्यबळ**

पोलिस निरीक्षक १, सपोनि ३, पोउपनि ३. चालक४ , बिट जमादार४, बिट मदतनीस ४, मोहरील १, हजेरी १, तसेच क्राइम, गुप्त वार्ता व वायरलेस १, उपविभागीय कार्यालय, राजुरा, कोर्ट-३.

**आणखी ४३ कर्मचाऱ्यांची गरज**

अनेक वर्षापासून या पोलिस ठाण्याला लोकसंख्येनुसार मनुष्यबळाचा कोटा दिलेला आहे. तो अद्यापही कायम आहे. वास्तविक पाहता आजघडीला लोकसंख्या वाढली आहे. त्यानुसार कर्मचारी संख्या वाढणे गरजेचे होते. मात्र, तसे झाले नाही. सध्या तरी ४३ च्या वर पोलिस कर्मचारी गरजेचे आहेत.

**कर्मचाऱ्यांमध्ये कामाचा तनाव**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपुऱ्या मनुष्यबळामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढत असून, त्याचा परिणाम शरीर प्रकृतीवर होत आहे.

गेल्या एक वर्षापासून वरिष्ठांकडे पोलिस कर्मचारी वाढवून देण्याची मागणी होत आहे. परंतु, वाढीव पोलिस कर्मचारी अजूनपर्यंत मिळाले नाहीत.

# शिळ्या, उरलेल्या अन्नाच्या विल्हेवाटीसाठी अन्नाची कदर शेतकऱ्यांचा आदर

**पर्यावरणपूरक उपक्रम, जनजागृतीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे**

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १६:** अन्नाची कदर, शेतकऱ्यांचा आदर हा स्वच्छता,आरोग्य व पर्यावरणास पूरक ठरणारा उपक्रम कौतुकास्पद असून, ही भावना अधिकाधिक वाढीस लागून जागरूकता निर्माण व्हावी, याकरिता सर्वांनी प्रयत्नरत रहावे, असे मत मनपाच्या सहायक आयुक्त दीप्ती गायकवाड यांनी व्यक्त केले.



या उपक्रमासाठी गुरुवारी छत्री तलाव नजीकच्या उड्डाणपुलाजवळ खड्डा खोदण्यात आला. या खड्ड्याचे पूजन करताना गायकवाड बोलत होत्या. गणेशोत्सव, महालक्ष्मी आणि त्यानंतर येणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी महाप्रसाद होतात. या महाप्रसादानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नाची योग्य मार्गाने विल्हेवाट लावण्यासाठी एमएच एटीएस ग्रुप्सतर्फे हा उपक्रम सात वर्षांपासून सुरळीत सुरू आहे. या वेळी, सर्वात आधी सहायक आयुक्त दीप्ती गायकवाड व जागरूक नागरिक संदीप गुल्हाने यांच्या हस्ते धरती मातेचे व अन्न देवतेचे पूजन करून गोळा केलेले अन्न धरती मातेला अर्पण करण्यात आले. या वेळी दस्तूर नगर झोन कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी नरेंद्र देवरणकर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ्य निरीक्षक धनिराम कलोसे, प्रसाद कुलकर्णी, मनीष हडाले, योगेश कंडारे, मनीष नकवाल, धर्मेंद्र ढिके, मुन्ना महल्ले, पृथ्वी पांडे, ऋग्वेद घुरडे, किशोर कडू आदी उपस्थित होते.

पहिल्याच दिवशी प्रतिसाद स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणास पूरक ठरणाऱ्या या उपक्रमाला पहिल्याच दिवशी प्रतिसाद मिळाला. शहरातील जागरूक व स्वच्छताप्रिय नागरिकांनी प्रमोद पांडे यांच्याशी संपर्क साधला.

त्यानंतर अन्न संकलित करण्यात आले. आधी गरजू आणि भुकेल्यांना सन्मानाने अन्न देण्यात आले. त्यानंतर उरलेले अन्न आज छत्री तलाव पुलालगत धरती मातेला अर्पण करण्यात आले.

**ईद ए मिलाद निमित्त १५२ जणांचे रक्तदान**

# प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त जश्न-ए-ईदमिलादुन्नबी कमिटीच्या वतीने शोभायात्रेचा आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. १६ :** प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त ईद मिलादुन्नबी उत्सव समिती बुलडाण्याच्या वतीने रविवार१५ सप्टेंबर रोजी इक्बाल चौक येथे जामा मशिदीच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरात १५२ रक्तदात्यांनी रक्तदान करून पैगंबरांना अभिवादन केले.

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त जश्न-एइई मिलादुन्नबी कमिटीच्या वतीने सोमवार,१६ सप्टेंबर रोजी शोभायात्रेचा आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी ईद मिलादुन्नबी कमिटीचे अध्यक्ष नदीम.एस शेख, रईसोद्दीन काझी, वसीम खान, इमाद काझी, मौलाना कलीम, शेख साजिद, शेख सलमान, सय्यद अलीम, समीर पठाण, सय्यद तस्लीम, मो.शादाब, शेख जुबेर आदींनी प्रयत्न केले. तर अड.जयश्री शेळके, पोलिस निरीक्षक नरेंद्र ठाकरे, अड.सतिष रोठे, डॉ.अनिस खान, अड.संजय राठोड, मो.सज्जाद, मोईन काझी, नवेद काझी, कुणाल गायकवाड, जाकीर कुरेशी, युनूस खान, सुफियान नेते, बबलू कुरेशी, सत्तार कुरेशी, कुणाल पैठणकर, जावेद खान, नवाब मिर्झा, सय्यद आसिफ, गजेंद्र दांदेड, शब्बीर कुरेशी आदी मान्यवरांनी भेट दिली. विशेष असे की, जिल्हा रुग्णालयातील रक्त संकलन टीमकडे रक्त संकलनासाठी पिशव्या नसल्याने सुमारे दीडशे ते दोनशे तरुणांना परतावे लागले.

ईद मिलादुन्नबी समिती द्वारे आत्तापर्यंत अजान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, अजमत-ए-मुस्तफा सम्मेलन, नातीया मुशायरा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे डॉ.भिलवेकर, विनोद झगरे, पूजा बनकर, अभिजीत राजपूत, सागर आडबे, संघपाल वाठोरे, अनिल घोडेस्वार, सागर पाटील, खलील पठाण यांनी रक्त संकलनासाठी अथक परिश्रम घेतले.सोमवार, १६ सप्टेंबर रोजी बुलडाणा शहरात प्रेषित मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. शहरातील इंदिरा नगर, जुनागाव येथील अनुयायी इक्बाल चौकात जमा होतील, त्यानंतर इक्बाल चौकातून निघालेली भव्य मिरवणूक शहरातील विविध रस्त्यांवरून ईदगाह वर पोहोचेल येथे मिरवणुकीचा समारोप होईल.

# अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांची छापेमारी:साडेपंधरा हजारांचा मुद्देमाल केला जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
**मोताळा, दि. १६ :** बोराखेडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीला लगाम लावण्यासाठी बोराखेडी पोलिसांनी वेगवेगळ्या सात ठिकाणी छापेमारी करत१५ हजार६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत ७ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच३' ३१ बेशिस्त वाहनांवर कारवाई करत हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. सदर कारवाई १४ सप्टेंबर रोजी बोराखेडी पोलिसांनी केली.



बोराखेडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैधरीत्या सुरू असलेल्या दारू विक्रीवर तसेच बेशिस्त वाहनांवर कारवाई करण्यासाठी १४ सप्टेंबर रोजी बोराखेडी पोलिसांच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात आली. यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सारंग नवलकार यांच्या नेतृत्वात पथक नेमण्यात आले होते. त्यामध्ये सपोनि बालाजी शेंगेपल्लू, पीएसआय राजेंद्र कपले, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मधुकर महाजन, शरद खर्चे, पोहेकॉ नंदकिशोर धांडे, रामदास गायकवाड, सुपडासिंग चव्हाण, अशोक आडोकार, पोकॉ अभिनंदन शिंदे, श्रीकांत चिंचोले, गणेश वाघ यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने अवैधरीत्या सुरू असलेल्या दारू विक्रीवर छापेमारी करत पिंप्री गवळी येथील विजयसिंग हरसिंग राणे, आडविहीर येथील रामेश्वर जगन सोनुने, तांदुळवाडी येथील धनराज जुनारे, डिडोळा बु. येथील विश्वनाथ खांडेकर, डिडोळा येथील संदीप शिराळ, वडगाव येथील संजय पाटील, दाभाडी येथील वासुदेव खर्चे यांच्याकडून१५ हजार६८० रुपयांची देशी, विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बेशिस्त वाहनधारकांवर पोलिसांनी उगारला कारवाईचा बडगा मागील काही दिवसांपासून काही वाहनधारक त्यांची वाहने अस्ताव्यस्त उभी करत होते. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. तसेच काही युवक परवाना नसताना भरधाव वाहने चालवून स्टंटबाजी करत होते. तर काही वाहनधारक वाहतुकीचे नियम मोडून ट्रिपल सीट वाहने चालवत होते. अशा ३१ बेशिस्त वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार १४ हजार रुपये अनपेड दंडात्मक कारवाई १४ सप्टेंबर रोजी बोराखेडी पोलिसांच्या वतीने करण्यात आली आहे.

# १ लाख ६ हजार ग्राहकांचे ११ कोटी माफ:कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांसाठी अभय योजना

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ, दि. १६ :** वीज बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या जिल्ह्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वर्गवारीतील १ लाख ६ हजार ४४२ ग्राहकांना महावितरण अभय योजनेमध्ये सहभागी होऊन थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी थकबाकीची कोटी ३१ लाख मुद्दल रक्कम भरल्यास थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण ११ कोटी ८४ लाख रुपये माफ होणार आहे.



महावितरणच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांकडून विविध समस्यांमुळे थकबाकी वसूल करणे आव्हानात्मक ठरते. अनेक ठिकाणी जागेचे मालक बदलल्यामुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रकरणात वाढ झाली. थकबाकीची रक्कम व्याजासह वसूल करण्याचा अधिकार महावितरणला असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने निकालात स्पष्ट केले. या ग्राहकांकडून थकबाकी वसुली होण्यासाठी वारंवार प्रयत्न झाले. मात्र, त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे आता महावितरणने थकबाकी वसुलीसाठी नव्याने प्रयत्न सुरू केले. अभय योजना १ सप्टेंबरपासून लागू केली. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित सर्व उच्चदाब व लघुदाब ग्राहक योजनेसाठी पात्र असतील.

सहा हप्त्यात थकबाकी भरता येणार या योजनेत मुद्दल बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सोय आहे. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल. उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.

# माजी पालकमंत्री, खासदार, महापौरांनी जागवल्या कॉम्रेड येचुरी यांच्या आठवणी

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १६:** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस कॉम्रेड सिताराम येचुरी हे युगप्रवर्तक होते. असीम विचारधन आणि कमालीची विद्वत्ता याआधारे त्यांनी देशातील डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांना भुरळ घातली होती. गल्ली ते दिल्ली जिवंत संपर्क राखणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या निधनामुळे डाव्या चळवळीची मोठी हानी झाली आहे. अशा एक ना अनेक आठवणी श्रद्धांजली सभेत ताज्या करण्यात आल्या. अमरावती येथील रेल्वे स्टेशन चौक स्थित उर्जा भवनात या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. माकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य प्रा. उदयन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेला दिल्लीत काही काळ येचुरी यांचे शेजारी राहिलेले माजी खासदार अनंत गुढे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले व मिलींद चिमोटे, भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत, राकाँचे ड. धनंजय तोटे, सरकारी कर्मचारी संघटनेचे नेते तथा ट्रेडयुनिनय कौन्सिलचे डी.एस. पवार आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. राज्यसभा सदस्य राहिलेल्या कॉम्रेड येचुरी यांचे अलिकडेच दिल्लीच्या एम्स हॉस्पीटलमध्ये निधन झाले. त्यामुळे विविध राजकीय पक्ष आणि कामगार संघटनांनी या श्रद्धांजली सभेचे आयोजन केले होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# डेनिम शर्ट दिसतो छान

दो स्तांनो, एक डेनिम शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलू शकतो. तुम्ही हा शर्ट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. शर्ट एकच असला तरी वेगवेगळे लूक मिळवू शकता. चला तर मग डेनिमचा हा शर्ट कसा कॅरी करायचा ते पाहू या.

✽ नेहमीचा पांढरा शर्ट ठेवा बाजूला आणि डेनिम शर्टने कूल लूक मिळवा. कोणत्याही रंगाच्या चिनोजवर हा शर्ट कॅरी करता येईल. यासोबत व्हाईट स्नीकर्स घाला. स्टार्ट अपचे मालक कॅज्युअल मिटिंगला हा लूक कॅरी करू शकतात. यासोबतच डिनर किंवा कॅज्युअल पार्टीलाही तुम्ही डेनिम शर्ट घालू शकता.

✽ डेनिम शर्ट आणि शॉर्टस हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. तुम्ही न्यूट्रल रंगाची शॉर्टस विकत घ्या. त्यावर डेनिम शर्ट घाला. यासोबत ब्राउन रंगाच्या लोफर्स शोभून दिसतील. कॅज्युअल आउटिंगला हा लूक कॅरी करा.



फॅशन पॅशन

✽ सौम्य रंगाचा डेनिम शर्ट आणि डार्क ब्लू जीन्स कॅरी करून डेनिम ऑन डेनिम लूक मिरवता येईल.

✽ डेनिम शर्टचा वापर लेअरिंगसाठीही करता येईल. पांढरा टी शर्ट त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हा पेहराव झक्कास दिसेल.

✽ काळ्या फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट उठून दिसतो.

✽ मिक्स अँड मॅचचं तंत्र फक्त मुलींपुरतं मर्यादित नाही. मुलंही आता अशी फॅशन करत आहेत. डेनिम शर्ट ब्लेझर पँटसोबतही कॅरी करता येईल. डेनिम शर्टवर टाय खूप शोभून दिसेल. ही स्टाईल सध्या भाव खाऊन जातेय.

# उद्योगशील अक्षय

**एखादा उद्योग सुरू करायचा म्हटलं की सर्वात आधी बाजारपेठेमध्ये कोणत्या प्रकारच्या मालाला सर्वात अधिक मागणी आहे हे तपासले जाते आणि त्यानुसार व्यवसायाला सुरुवात केली जाते. वडिलांच्या अकाली निधनानंतर आईने सुरु केलेला व्यवसाय सांभाळला अक्षय केदार यांनी. साहित्याचार्य न.चिं. केळकर यांचं जन्मगाव म्हणून सोलापूर जिल्ह्यातलं मोडनिंब प्रसिद्ध आहे. पण आता विविधांगी उद्योग करणाऱ्या कल्पक उद्योजकांचं गाव म्हणून त्याचा लौकिक वाढत आहे.**

अचिव्हर

अक्षय केदार या तरुणाने असाच यशस्वी उद्योग उभारला. त्याच्या 'साईप्रसाद फूड प्रॉडक्ट्स'च्या माध्यमातून शेंगदाण्याचे लाडू, बेसन लाडू, डिंक लाडूंची विक्री होते. वर्षभरामध्ये लाखो रुपयांची उलाढाल केवळ लाडू विक्रीतून करणारा हा विक्रमी उद्योजक आहे. आईच्या लाडूंना असलेली मागणी बघून अक्षय यांनी पूर्णवेळ या व्यवसायात यायचं ठरवलं. अक्षय यांचे वडील नारायण केदार यांचं अचानक निधन झाल्यानंतर त्यांची आई ज्योती यांनी विद्यार्थ्यांसाठी शाळांबाहेर लाडूविक्रीचा उद्योग आरंभला. शेंगदाणा, बेसन आणि डिंकलाडू बनवण्याची त्यांची खास पद्धत विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पालकांनाही आवडली. त्यामुळं फक्त शाळेतच नव्हे तर मुख्य बाजारपेठेतील विविध दुकानांमधून लाडूची मागणी वाढली. त्या स्वतः एकट्याच हे लाडू तयार करून देत होत्या. हळूहळू काही महिलांना त्यांनी मदतीला घेतलं. त्यावेळी असलेल्या मागणीची पूर्तता करणं त्यांना शक्य होत नव्हतं, इतकी बाजारातून त्यांच्या लाडूंना मागणी मोठी होती. अक्षयने जेव्हा या उद्योगातील गती आणि प्रगतीच्या शक्यता पाहिल्या, तेव्हा पूर्णवेळ हाच व्यवसाय वाढवायचं त्यांनी ठरवलं. मोडनिंबच्या 'साईप्रसाद'चे लाडू पंचक्रोशीत लोकप्रिय झाले ते त्यांच्या खास चवीमुळं. उन्हाळा, हिवाळा, पावसाळा; ऋतू कोणताही असला तरी शेंगदाणा, बेसन आणि डिंकलाडूंना प्रचंड मागणी असते. लाडू वळण्यासाठी सुरुवातीला ते मशिनचा वापर करत होते. एकाच आकाराचे लाडू मशिनमधून तयार होत. पण बऱ्याचदा ते घट्ट होत. लाडूची बांधणी नेमकी होणं आवश्यक असतं. घट्ट लाडू कुणी खात नाही. म्हणून मग हाताने वळूनच त्यांचं पार्सल करायला सुरुवात केली. साईप्रसाद फूड प्रॉडक्ट्स'मध्ये लाडूसाठी खास प्रकारचा शेंगदाणाच वापरला जातो. घुंगरू आणि इतर शेंगदाण्यांचं मिश्रण केलं जात नाही. बेसन आणि डिंक लाडू करतानाही विशिष्ट कच्चा मालच वापरला जातो. त्यामुळे बाजारात लाडू विक्री करणारे अन्य लोक असले तरी साईप्रसादच्या लाडूंची सर त्यांना येत नाही. म्हणूनच रोज नवीन ऑर्डर्स त्यांच्याकडे येत राहतात. उन्हाळ्यात, हिवाळ्यात ऑर्डर पुरवण्यासाठी १६ तास काम करावं लागतं. पावसाळ्यात मागणी थोडी कमी असते, पण ती पुरवणंही कष्टाचं काम असतं. मोडनिंब आणि परिसरातील ५० महिलांना यातून हंगामनिहाय रोजगार पुरवला जातो. सुरुवातीला घरातील एका खोलीत आरंभ झालेल्या या लाडूच्या उद्योगासाठी आज दोन हजार चौरस फुटांचा कारखाना बांधण्यात आला आहे. दोन एकरचं क्षेत्र त्यासाठी घेतलं आहे. दशकभराच्या कालावधीत मोडनिंबच्या लाडूंनी पश्चिम महाराष्ट्र पादाक्रांत केला आहे. येत्या काळात मराठवाड्यात आपलं उत्पादन पोहचवण्याचं अक्षय यांचं उद्दिष्ट आहे. त्यांच्या उद्योगाची गती व प्रगती पाहता संपूर्ण महाराष्ट्रात लाडू विक्रीचं त्यांचं ध्येय लवकरच पूर्ण होईल, यात शंका नाही.



# जोश

## शेर की जुबानी

हम तो अल्फाज ही ढूंढते रह गए,
और वो आंखों से गझल कह गए।

जिंदगी एक हसीन ख्वाब है,
जिसमें जीने की चाहत होनी चाहिये।
गम खुद ही खुशी में बदल जाएँगे,
मुस्कुराने की आदत होनी चाहिये।

हम तो आईना है, आईना ही रहेंगे।
फिक्र वो करें...
जिनके चेहरे पर कुछ और
दिल में कुछ और है।

## हाऊ टू?

### मेसेज बनावट की अस्सल?




व्हॉट्स अॅपवर बरेच फेक म्हणजेच बनावट मेसेज येतात. कोणतीही शहानिशा न करता असे मेसेज फॉरवर्ड केले जातात. तुम्हाला आलेले मेसेज बनावट आहेत किंवा नाहीत हे ओळखता येईल. व्हॉट्स अॅपवर आलेल्या फोटो किंवा व्हिडिओची सत्यता पडताळून पाहण्यासाठी गूगलची मदत घेता येईल. बरेच फोटो किंवा व्हिडिओ एडिट करून पाठवलेले असतात. त्यामुळे हे फोटो किंवा व्हिडिओ गूगलवर सर्च केले तर तुम्हाला नेमकं सत्य कळू शकतं. तसंच मेसेजमधला मजकूर चुकीचा तर नाही ना, हे तपासूनच तो फॉरवर्ड करा.

## स्मार्ट टिप्स

### बंद करा 'ऑटो अपडेट'




बऱ्याच जणांच्या कॉम्प्युटर, लॅपटॉपमध्ये 'विंडोज १०' असेल. अनेक आकर्षक फीचर्समुळे 'विंडोज १०' हवंहवंसं वाटतं. मात्र यातलं एक फीचर त्रासदायक ठरू शकतं. ऑटो अपडेट फीचर ऑन असेल तर तुमच्या डिव्हाइसमध्ये नवनवी अपडेट्स डाउनलोड होत राहतात. काहींना या अपडेट्सचा त्रास होतो. हे टाळण्यासाठी तुम्ही 'ऑटो अपडेट' बंद करू शकता. यासाठी 'सेटिंग्ज'मध्ये जा. इथे 'अपडेट आणि सिक्युरिटी' या ऑप्शन्सवर क्लिक करा. इथे 'विंडोज अपडेट' पर्यायावर क्लिक करा. यानंतर 'अॅडव्हान्स अपडेट्स'मध्ये जाऊन 'पॉझ अपडेट' मध्ये 'ड्रॉप डाउन मेनूवर क्लिक करा. इथे 'ऑटो अपडेट' बंद करण्याचा पर्याय दिसेल. तो निवडा

## टेक ज्ञान

### किती रॅमचा फोन घ्यावा?



स्मार्टफोन घेताना त्यातल्या रॅमकडे लक्ष द्यावं लागतं. आता सहा, आठ, बारा रॅमवाले फोन मिळतात. मात्र प्रत्यक्षात किती रॅमचा फोन योग्य ठरतो? जाणून घेऊ. प्रत्येकाचा वापर वेगवेगळा असतो. त्यामुळे रॅमची गरजही वेगळी असून शकते. तुम्हाला गेमिंगची आवड असेल तर आठ ते १२ जीबी रॅमचा फोन घ्या. तुम्ही गेम खेळत नसाल तर सहा जीबी रॅमपर्यंतचा फोन पुरतो. फोनवर मल्टीटास्किंग करत असाल तर अधिक रॅमचा फोन लागेल. अन्यथा सहा जीबी रॅममध्ये तुमचं काम होऊ शकतं.

## सोशल मीडिया

### डाउनलोड फोर के व्हिडिओ




सध्या फोर के व्हिडिओचा जमाना आहे. हे व्हिडिओ सुस्पष्ट दिसतात. यू ट्यूबवरही फोर के व्हिडिओ बघता येतील. अर्थात यासाठी एक अॅप डाउनलोड करावं लागेल. 'फोर के व्हिडिओ डाउनलोडर फॉर डेस्कटॉप' नावाचं हे अॅप आहे. हे अॅप इन्स्टॉल झाल्यावर यू ट्यूब सुरू करा. यू ट्यूब व्हिडिओचं यूआरएल कॉपी करा. आता फोर के व्हिडिओ अॅप ओपन करून यूआरएल पेस्ट करा. इथे फोर के व्हिडिओ ऑप्शन निवडून डाउनलोडवर क्लिक करा. आता फोर के व्हिडिओ डाउनलोड होईल.



# त्याच्या आईच्या हस्तक्षेपामुळे...

मॅच मेकिंग

मी २१ वर्षांची तरुणी आहे. गेल्या तीन वर्षांपासून एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये आहे. आमचं सगळं सुरळीत सुरू होतं. पण त्याने आमच्याबद्दल घरी सांगितल्यानंतर त्याची आई आमच्या विविध गोष्टींमध्ये नाक खुपसू लागली आहे. आधी आमच्यातली भांडणं आम्हीच सोडवायचो. पण आता भांडण झाल्यावर त्याची आई मला फोन करते. कुठे फिरायला जायचं म्हटलं की तो आधी घरच्यांना विचारतो. मध्यंतरी दोन वेळा आम्ही चित्रपट बघायचा प्लॅन केला. पण नेमकी तेव्हाच त्याची आई आजारी पडल्याने सगळंच बारगळलं. मी याबाबत माझ्या मित्राशी बोलले. पण तो मलाच दोष देत आहे. आमच्यात असा विसंवाद कधीच नव्हता. ही परिस्थिती कशी हाताळू?

**उत्तर** : तू या नात्यापासून स्वत:ला थोडं बाजूला कर. तुला कशातून आनंद मिळतो हे ठरव. आयुष्याकडून तुला नेमकं काय हवं आहे हे जाणून घे. प्रियकराकडे तुझ्या भावना व्यक्त कर. त्याच्या वागण्याने दुःख झाल्याचंही सांग. तुला त्याच्या कुटुंबियांबद्दल आदर वाटत असल्याचं आवर्जून नमूद कर. या नात्याच्या काही मर्यादा ठरव. यामुळे तू प्रियकराला समजून घेऊ शकशील. तसंच त्यालाही ही परिस्थिती हाताळायला वेळ मिळेल. त्याचीही द्विधा मनस्थिती होत असेल. तू आणि आई यांच्या कात्रीत तो सापडला असेल. तसंच लग्नाआधी समुपदेशकांचीही मदत घे.

# ग्लो वाढवण्यासाठी...

दो स्तांनो, पुरुषांची त्वचा स्त्रियांच्या त्वचेपेक्षा सॉफ्ट नसते. तुलनेने त्यांची त्वचा कडक असते. तसेच जाड दाढी आणि मिशांमुळे त्यांच्या त्वचेत घाम अधिक जमा होतो. यामुळेच त्यांच्या स्किनवर नंतर मुरुम आणि डाग पडतात. याशिवाय चेहऱ्यावर जास्त काळ घाण साचल्याने त्वचेची चमक निघून जाते आणि त्वचा निस्तेज दिसू शकते. अशा परिस्थितीत, पुरुष या गोष्टींचा त्यांच्या स्किन केअर रूटीनमध्ये समावेश करू शकतात ज्यामुळे त्यांना चमकदार त्वचा मिळण्यास मदत होऊ शकते.

✽ दाढी केल्यानंतर मॉइश्चरायझर लावा: शेव्हिंग केल्यानंतर त्वचेला मॉइश्चरायझ करणे फार महत्त्वाचे



आहे. कारण, दाढी केल्याने त्वचा कोरडी होते. अशा परिस्थितीत मॉइश्चरायझर वापरल्याने तुमच्या त्वचेतील कोरडेपणा कमी करून त्वचा हायड्रेट ठेवण्यास मदत होऊ शकते.

✽ रात्री झोपण्यापूर्वी चेहरा साफ करा: रात्री झोपण्यापूर्वी चेहरा जरूर स्वच्छ करा. ही सवय लावणे खूप गरजेचे आहे, अन्यथा तुम्हाला त्वचेशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे रात्री झोपताना चेहरा स्वच्छ करा.

ग्रुमिंग

✽ सनस्क्रीन लावा: घराबाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन लावल्याने तुमची त्वचा अनेक समस्यांपासून वाचू शकते. हे सूर्यप्रकाशामुळे होणाऱ्या सर्व नुकसानापासून त्वचेचे संरक्षण करू शकते जसे की ते सूर्यप्रकाशात कारणीभूत ठरू शकते. याशिवाय त्वचेतील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते.

✽ दिवसातून दोनदा त्वचा स्वच्छ करा: पुरुष त्वचेच्या स्वच्छतेकडे कमीत कमी लक्ष देतात. तर हे सर्वात महत्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक पुरुषाने दिवसातून दोनदा स्किन क्लीनिंग करायला हवी. यासाठी तुम्ही चारकोल, मुलतानी माती किंवा पुदिना यांसारख्या घटकांसह क्लीन्सर वापरू शकता.

# शिका सॉईल सायन्स



वेगळ्या वाटा

विज्ञानाची विविध अंग आहेत. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, समुद्रशास्त्र, भूगर्भशास्त्र यांप्रमाणे सॉईल सायन्स म्हणजे मृत्तिका विज्ञान हे सुद्धा विज्ञानाचं एक अंग आहे. यात नावाप्रमाणे मातीचा अभ्यास केला जातो. या शास्त्रात मातीकडे नैसर्गिक स्त्रोत म्हणून पाहिलं जातं. या शास्त्रात मातीची निर्मिती, वर्गीकरण, मातीचे जैविक, रासायनिक आणि भौतिक गुणधर्म तसंच तिच्या उपयुक्ततेविषयी माहिती मिळवली जाते. आपल्या देशात मातीची चाचणी आणि संशोधनासाठी प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. मातीचा दर्जा तपासण्यासोबतच इतर कामांसाठीही तज्ज्ञांची गरज लागते. म्हणूनच आज या क्षेत्रातही नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. राज्य आणि केंद्र सरकारच्या कृषी विभागातही या तज्ज्ञांची गरज असते. विविध महाविद्यालयं आणि विद्यापीठांमध्ये सॉईल सायन्सचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यात पदवी तसंच मास्टर्स करता येईल. यासोबतच सॉईल फॉर्मेशन,सॉईल क्लासिफिकेशन, सॉईल सर्व्हे, सॉईल मिनरोलॉजी, सॉईल बायोलॉजी असे बरेच अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तुम्ही या क्षेत्रात संशोधनही करू शकता.





# लज्जतदार पेस्तो पास्ता

दो स्तांनो, पास्ता खाण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जाण्याची गरज नाही. तुम्ही घरच्या घरीच पेस्तो पास्ता बनवू शकता. या निमित्ताने मित्रमंडळींसोबत मस्त पास्ता पार्टीही करता येईल.

**सामग्री:** तीन कप पास्ता, चमचाभर ऑलिव्ह ऑईल, एक चमचा लसूण पेस्ट, एक सिमला मिरची, अर्धा कप फ्रेश क्रीम, पाव कप दूध, चमचाभर चिली फ्लेक्स, किसलेलं चीझ, मीठ.

पेस्तो सॉससाठी– पाव कप अक्रोड, वाटीभर बासिल, तीन चमचे ऑलिव्ह ऑईल, दोन लसूण पाकळ्या



**कृती:** पेस्तो सॉस बनवण्यासाठी सर्व घटक मिक्सरच्या भांड्यात घालून वाटून घ्या. पास्ता उकडून घ्या. आता एका कढईत ऑलिव्ह ऑईल घाला. थोडं गरम झाल्यावर त्यात लसूण पेस्ट घालून

झटपट रेसिपी

थोडं परतून घ्या. मग चिरलेली सिमला मिरची घालून परता. आता त्यात पेस्तो सॉस, फ्रेश क्रीम, दूध, चिली फ्लेक्स आणि मीठ घाला. दोन मिनिटं ढवळत रहा. यानंतर त्यात उकडलेला पास्ता घालून हलवून घ्या. दोन मिनिटं शिजू द्या. वरून किसलेलं चीझ घाला. गरमागरम खा.

# अनुभवा मोल्लेमचं सौंदर्य

गोव्यापासून काही किलोमीटर अंतरावर मोल्लेम नावाचं गाव आहे. कर्नाटक सीमेजवळचं हे गाव खूप सुंदर आहे. इथे एक अभयारण्य आहे. हे अभयारण्य पाहण्यासाठी लोक मोठ्या संख्येने इथे येतात. मोल्लेम गावात तुम्ही निवांत क्षण घालवू शकता. या परिसरात प्राचीन खडक पहायला मिळतात. हे खडक ३६०० अब्ज वर्षांपूर्वीचे असल्याचं म्हटलं जातं. इथल्या तांबडी सुरला परिसरात शंकराचं पुरातन मंदिर आहे. हे स्थान गोव्यातल्या कदंबा राजवटीचं प्रतीक मानलं जातं.



मोल्लेमचं निसर्गसौंदर्य आपल्या नजरेत भरतं. दोन दिवसांच्या छोट्या ट्रिपसाठी हे स्थान अगदी योग्य आहे. इथे खूप धमाल करता येतो. वीकेंडला कुठे जायचं हा प्रश्न पडला असेल तर मोल्लेमची निवड करता येईल. या ठिकाणी कोकण रेल्वेने जाता येईल. मडगाव रेल्वे स्थानकावरून मोल्लेम ५० किलोमीटर अंतरावर आहे. स्वत:च्या वाहनानेही या ठिकाणी जाता येईल. या प्रवासादरम्यान सुंदर निसर्ग अनुभवता येईल. तरुणाई नेहमीच हटके ठिकाणांच्या शोधात असते. अशा कलंदरांसाठी मोल्लेम हे ठिकाण योग्य ठरेल.

भटकंती



## थोडक्यात..

### अजित पवारांनी घेतले फडणवीसांच्या घरी बाप्पांचे दर्शन



■ **मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली. अजित पवारांनी मुंबईतील विविध गणेश मंडळांना भेट देत दर्शन घेतले. काँग्रेस आमदार अमीन पटेल हे देखील राष्ट्रवादीत प्रवेशाची चर्चा सुरु झाली आहे. अमीन पटेलांच्या राष्ट्रवादी प्रवेशाबाबत 'सागर'वर मंथन झाले. अमीन पटेल, अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमध्ये २० मिनिटे चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या साक्षीने अमीन पटेल-अजितदादांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

### विसर्जनासाठी मुंबईत २०४ कृत्रिम तलाव तयार

■ **मुंबई :** अनंत चतुर्दशीदिनी मंगळवारी होणाऱ्या श्री गणेश विसर्जनासाठी मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे. विसर्जन सुलभ, निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष तसेच अन्य विविध सोयी-सुविधांसह सज्ज आहेत. यंदा गणेश मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर व्यवस्था केली आहे.

# दादा लवकरच बॅक टू होम?



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अर्ध्याहून अधिक आमदार शरद पवार गटात जातील. एवढेच नाही तर स्वतः अजित पवारही काही दिवसांनी तिकडेच दिसतील, असा दावा प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनी सोमवारी केला. त्यांच्या या विधानाने राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

बच्चू कडू यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसमधील संभाव्य घडामोडींवर भाष्य केले. ते म्हणाले की, आगामी काळात अजित पवार यांचे अर्ध्याहून अधिक आमदार हे शरद पवार गटात जातील. त्यानंतर काही दिवसांनी स्वतः अजित पवारही तिकडेच दिसतील. त्यांना कुणीही अडवले नाही. शेवटी हे राजकारण आहे. कधी कुणाच्या पारड्यात जाऊन बसायचे किंवा कुणाबरोबर रहायचे हा सर्वस्वी ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

बच्चू कडू यांनी यावेळी भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून रंगलेल्या श्रेयवादावरही भाष्य केले. ते म्हणाले, राज्यात सध्या ३ पक्षांचे सरकार आहे. त्यामुळे त्याच्यात श्रेयवादाची लढाई होणारच. ते संयुक्तिकही आहे. भाजप लाडकी बहीण योजना आपणच आणल्याचा दावा करत आहे.

शिंदे गटही असाच दावा करत आहे. अजित पवारांचा राष्ट्रवादीही राज्यभर फिरून ही योजना आम्ही आणल्याचा दावा करत आहेत. शेवटी ही लाडकी बहीण योजना कुणी आणली? हे त्यांनाच ठरवायचे आहे.

बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये मोर्चा काढला होता. त्यानंतर आता त्यांनी मुंबईतही मोर्चा काढण्याची घोषणा केली. मुंबईतील मोर्चा तिसरी आघाडी म्हणून काढण्याची आमची इच्छा होती. यासंबंधी १९ सप्टेंबर रोजी पुण्यात एक बैठक आयोजित करण्यात आली आहे. तिथे यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल. आगामी निवडणुकीत महाराष्ट्रात तिसरी आघाडी निश्चितच दिसेल, व याचा परिणामही दिसेल, असे ते म्हणाले.

## बुलेट चालकाने महिलेला उडविले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:**

भरधाव असलेल्या बुलेटच्या चालकाने रस्ता ओलांडत असलेल्या एका महिलेला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. वंदना श्रीराम नाईक (45) रा. अध्यापकनगर, असे मृत महिलेचे नाव आहे.

रविवारी सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास वंदना मानेवाडा चौकातून उदयनगरकडे जात होत्या. पार्थ पॉवर टूल्ससमोर आरोपी बुलेट क्र. एमएच-49/सीसी-6399 च्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. हुडकेश्वर पोलिस घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी वंदना यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. रात्री 8.30 वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी वंदना यांचे पतीने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी बुलेट चालकावर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## धनगरांना आरक्षण देण्यावर समिती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासंबंधी एक समिती नियुक्त केली आहे. ही समिती धनगर व धनगड ही एकच जात असल्याचा शासनादेश (जीआर) काढण्यासंबंधी योग्य तो निर्णय घेईल.

या निर्णयामुळे धनगर समाजात आनंदाचे वातावरण असताना आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने सरकारच्या या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय घेताना आम्हाला विश्वासात घ्यायला हवे होते, असे राष्ट्रवादीने म्हटले आहे.

### अजित पवारांची राष्ट्रवादी नाराज

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत अर्थात एसटीत समावेश करण्याच्या मागणीसाठी पंढरपूरसह राज्यात काही ठिकाणी उपोषण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर एक समिती स्थापन केली आहे. विधानसभेचे उपसभापती नरहरी झिरवळ यांनी या निर्णयावर हरकत नोंदवली आहे.

हा निर्णय घेताना त्यांनी आम्हाला विश्वासात घेण्याची गरज होती. त्यांनी आदिवासी समाजाच्या प्रतिनिधींना बैठकीला बोलावायला हवे होते, आम्हाला डावलले असे झिरवळ म्हणाले.

## शासनाकडे सतत पाठपुरावा केल्याचे फलित

■ **महासागर प्रतिनिधी, संग्रामपूर, दि. १६:**



शहरासह तालुक्यातील वाढते नागरीकरण व लोकसंख्येचा विचार करता शहर व इतर गावांचा तसेच सर्व शासकीय कार्यालये ही अद्यावत व सुसज्ज असावीत यासाठी प्रयत्नशील आहोत. विकासाचे संदर्भात शासनाकडे सतत पाठपुरावा केला होता, याचे फलित म्हणून संग्रामपूर शहरातील नवीन बांधकामासाठी राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिला, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार डॉ. संजय कुटे यांनी केले. संग्रामपूर येथे २३ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भुमिपूजन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

संग्रामपूर नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सौ. उषाताई सोनोने, संग्रामपूर तालुका भाजपा अध्यक्ष लोकेश राठी यांची प्रमुख उपस्थिती होती. जल जीवन मिशन अंतर्गत संग्रामपूर शहराकरिता वाढीव पाणीपुरवठा योजना, कब्रस्तान कडे जाणारा पूल व रस्ता बांधकाम, संग्रामपूर हद्दीतील चौक सौंदर्यीकरण रस्ते बांधकाम व इतर कामे, हिंदू स्मशानभूमी बांधकाम, आठवडी बाजारातील जगदंबा संस्थान येथे सभागृह बांधकाम, तामगाव पोलीस स्टेशनकडे जाणारा रस्ता व नाली रुंदीकरण, नगरपंचायतीच्या जागेवर व्यापारी गाळे बांधकाम, माताजी निर्मलादेवी सभामंडप बांधकाम, 'पंचायत समिती ते डॉ. महाजन यांचे घरापर्यंत रस्ता बांधकाम लोकार्पण, पंचायत समिती संग्रामपूरच्या नवीन इमारतीचे बांधकाम आदी कामांचा समावेश आहे.

> संग्रामपूर येथे सन १९६२ पासुन पंचायत समिती स्थापन झाली होती.त्या काळातील इमारत जीर्ण होवून पावसाळ्यात सर्वत्र गळत होती. इमारतीचा स्लॅब कोसळून एक सामाजिक कार्यकर्ता महिला जखमी झाली होती. कोणतीही जिवीत हानी होवू नये, शासकीय कार्यालये ही अद्यावत व सुसज्ज असावीत, यासाठी प्रयत्नशील असून पुढेही सेवेसाठी कार्यरत राहू, अशी ग्वाही डॉ. संजय कुटे यांनी दिली.

## : हॅलो डॉक्टर : रक्ताचा कर्करोग लिम्फोमा



लोकारोग्य

कर्करोग मग तो मुखाचा असो, फुफ्फुसाचा, स्त्रियांमध्ये स्तनाचा किंवा ल्युकेमिया अर्थात कोणत्याही प्रकारच्या रक्ताचा कर्करोग असला तरी या रोगाचे वेळीच निदान केले गेले नाही तर रुग्णाचा मृत्यू हा अटळ असतो.

अलिकडच्या काळातील वैद्यकीय संशोधनातून रक्ताच्या कर्करोगाचा लिम्फोमा हा नवा प्रकार समोर आलेला आहे. दरवर्षी जगभरात सुमारे २५,००० या लिम्फोमा आजाराचे निदान केले जाते. भारतात असे निदान झालेल्या ३० ते ४० टक्के लोकांना पाच वर्ष देखील जगता येत नाही. सर्व डी. एल. बी. सी. एल रुग्णांपैकी ४० टक्के रुग्णांना प्राथमिक उपचारानंतर हा रोग पुन्हा होतो आणि वाढत जातो. मात्र आपल्या देशात आता लिम्फोमा आजारांकरिता प्रथम श्रेणी उपचारांसाठी एफ.डी.ए मान्यताप्राप्त पहिली थेरपी उपलब्ध आहे. याच अनुषंगाने लिम्फोमा आजार कारण आणि उपचार या संदर्भात बोमबे हॉस्पिटलचे हिमॅटॉलॉजी प्रमुख डॉक्टर एम. बी. अग्रवाल यांच्याशी साधलेला संवाद.

**लिम्फोमा हा नेमका काय आजार आहे?**

लिम्फोमा हा रक्ताच्या कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार आहे आणि भारतात याचे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे. अशा वेळी प्रगत उपचार पर्याय दिवसेंदिवस आवश्यक होत आहेत .डिफ्युज लार्ज बी सेल लिम्फोमा [डी .एल.बी. सी .] हा नॉन हॉजकिन लिम्फोमा चा सर्वात आक्रमक प्रकार आहे आणि देशात एकट्या डिफ्युज लार्ज बी सेल लिंफोमामुळे दरवर्षी २५००० नवे रुग्ण सापडत आहेत. सद्यःस्थितीत उपचारानंतर देखील ४० टक्के रुग्णांना हा रोग पुन्हा होतो म्हणूनच या रोगामुळे आरोग्यसेवा प्रणाली करिता महत्वपूर्ण आव्हाने निर्माण झालेली आहेत.

**या आजाराची लक्षणे काय? याचे निदान कसे केले जाते?**

सर्वसाधारण आपल्याला जो ताप येतो हे ताप येणे म्हणजे लिंफोमाचे लक्षण असू शकते. मात्र तापाचे अनेक प्रकार आहेत. रुग्णाला जर वारंवार काही महिने ताप येत असेल तर ठराविक वैद्यकीय चाचण्या करून घेणे गरजेचे आहे. यातही प्रचंड गुंतागुंत आहे.

अनेकदा अशा प्रकारे तापाचे निदान हे क्षयरोग असल्याचे देखील होते त्यानंतर ताबडतोप उपचार देखील सुरु होतात मात्र या उपचारानंतर देखील रुग्ण बरा होत नाही तेंव्हा मग पुन्हा निदान केले जाते. आपल्या मानेभोवती किंवा गळ्याभोवती एखादी साधी वाटणारी गाठ असेल तर ती अशा कर्करोगाच्या पेशींचा समुच्चय असू शकते म्हणून बायोप्सी करून निदान करणे गरजेचे आहे.

**लिम्फोमा आजाराची कारणे काय? आजाराचे निदान करण्यात काय आव्हाने आहेत?**

लिम्फोमा हा साधारपणे रक्ताच्या कर्करोगाचा एक प्रकार आहे. हा आजार ठराविक कारणामुळे होतो असं सांगता येणार नाही. मात्र बदलती जीवनशैली ,चुकीची आहार पद्धती, अनेक प्रकारची प्रदूषण, धूम्रपान, मद्यपानाचा अतिरेक अशा कोणत्याही कारणामुळे हा आजार उदभवू शकतो. मात्र, हा आजार अनुवांशिक नाही.

हा आजार बरा करता येईल असा आणि संभाव्य पद्धतीने बरा होणारा आजार असला तरी मृत्युदर हा चिंताजनक आहे. विशेषतः हा आजार पुन्हा उद्भवतो आणि अनेकदा डॉक्टरांना सुरवातीला याचे अचूक निदान करता न आल्याने किंवा उशीर झाल्याने रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. त्यामुळेच वेळीच आणि अचूक निदान हे महत्वाचे आव्हान आहे.

**लिम्फोमा आजारावर उपचार पद्धती कोणती आहे?**

जवळपास दोन दशकानंतर प्रथमच डी.एल.बी.सी एल उपचारामध्ये अभूतपूर्व प्रगती केली गेली आहे आणि ती आहे केमोथेरेपीच्या संयोजनात पोलाटूझुमब हे नवीन औषध देणे. हा रोग उपचारास कठीण रोग आहे आणि एन.एच.एल चा सर्वात सामान्य प्रकार आहे. सुमारे २० वषानंतर याच्या प्रथम श्रेणी उपचारांसाठी एड.डी.एने मान्यता दिलेली हि पहिली थेरेपी आहे .पोलाटूझुमॅब प्रथम श्रेणीतील अँटी सीडी ७९ बी अँटीबॉडी ड्रग कॉन्जुगेट आहे. मबथेरा / रितुक्सन अधिक सायक्लोफॉस्फामाईड, डोक्सोरुबीसीन ,विन्क्रिस्टीन आणि प्रेडनिसोन च्या विद्यमान मानक काळजीच्या तुलनेत रोग पुढे वाढत जाणे, तो पुन्हा होणे किंवा मरण पावणे यांच्या जोखमीत २७ टक्के लक्षणीय घट झालेली आहे. पोलातुझुमॅब ची सफलता एक उल्लेखनीय महत्वपूर्ण शोध आहे. जागतिक स्तरावर प्रथम श्रेणी वातावरणात २३,००० पेक्षा जास्त देशांमध्ये या औषधला मान्यता देण्यात आलेली आहे. ■ ■

## वनौषधी गुनौषधी जर्दाळूचे आरोग्यदायी फायदे




जर्दाळू, त्यांची मखमली त्वचा आणि गोड, किंचित तिखट चव असलेले, हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते पोषक तत्वांचे पॉवरहाऊस देखील आहे. चांगल्या दृष्टीला चालना देण्यापासून ते हृदयाच्या आरोग्यास समर्थन देण्यापर्यंत, जर्दाळू आपल्या आहारात एक योग्य जोड आहे.

जर्दाळू विविध प्रकारचे आरोग्य फायदे देते. जर्दाळूमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते, जे चांगली दृष्टी राखण्यासाठी आवश्यक असते. बीटा-कॅरोटीन हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे डोळ्यांना मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करते जर्दाळूच्या बियापासून काढलेले जर्दाळू तेल बहुतेक वेळा त्याच्या हायड्रेटिंग गुणधर्मासाठी स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जाते. व्हिटॅमिन ई आणि के समृद्ध, जर्दाळू कर्नल तेल त्वचेचे पोषण आणि मॉइश्चरायझेशन करण्यास मदत करते,

जर्दाळूमधील आहारातील फायबर पचनास मदत करते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते. फायबर स्टूलमध्ये जोडते, ज्यामुळे पचनमार्गातून जाणे सोपे होते. जर्दाळूचे नियमित सेवन केल्याने निरोगी पचनसंस्थेला हातभार लागतो आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल विकारांचा धोका कमी होतो.

जर्दाळूमध्ये पोटॅशियम असते, एक खनिज जे शरीरातील सोडियमच्या प्रभावांना संतुलित करून रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. जर्दाळूमधील विरघळणारे फायबर कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करून हृदयाच्या आरोग्यासाठी देखील भूमिका बजावते.

जर्दाळूमधील कॅल्शियम आणि पोटॅशियम हाडांची घनता आणि ताकद राखण्यासाठी आवश्यक खनिजे आहेत. कॅल्शियम हाडांच्या आरोग्याशी संबंधित असताना, पोटॅशियम शरीरातील कॅल्शियमचे शोषण सुधारते, हाडांचे खनिजीकरण वाढवते आणि हाडांची झीज रोखते. ■

## : आरोग्यनिती : हेल्थकेअर इन्क्युबेशन प्रोग्राम लॉंचची घोषणा




एनएसआरसीएल आयआयएम बंगळुरू आणि डेलि राउंड्स च्या सहकार्याने त्यांच्या हेल्थकेअर इन्क्युबेशन प्रोग्रॅमच्या लॉंन्चची नुकतीच घोषणा करण्यात आली. ही भागीदारी डेली राउंड्स च्या सीएसआर उपक्रमाचा एक भाग आहे,ज्याचे उद्दिष्ट सुरवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्सना समर्थन देणे आहे.

हा उपक्रम आरोग्यसेवेचा क्षेत्रातील अनन्य साधारण समस्यांचे निराकरण करणाऱ्या नवकल्पनांना जिवंत करण्यावर लक्ष केंद्रित करतो. हा कार्यक्रम आरोग्यसेवा नवोन्मेषकांना आणि उद्योजकांना प्रयोगशाळेत चाचणीपासून बाजारात तयार उत्पादनापर्यंत जाण्यास मदत करेल.

हा उपक्रम संस्थापकांना अशा प्रवासात घेऊन जातो की जिथे तयन डिझाईन विचार, उद्योग तज्ञांकडून मार्गदर्शन, व्यवसाय विकास मार्गदर्शन, त्यांची बाजारातील रणनीती तयार करणे, त्यांना बीटूबी आणि डी टूसी विक्री कशी चालवायची ते शिकवणे, नेटवर्किंगच्या संधी प्रदान करणे यासह संपूर्ण समर्थन देणारा उपक्रम आहे. संभाव्य निधी स्त्रोतांमध्ये प्रवेश आणि क्लिनिकल चाचण्या आणि पायलट प्रकल्पांसाठी रुग्णालय आणि प्रयोगशाळांमध्ये प्रवेश देखील या उपक्रमामुळे सुकर आणि सुलभ होणार आहे.

डेलीराउंड्स कंपनी ही डॉ. दिपू सेबीन यांची २०१३ मध्ये अशीच एक कल्पना होती डॉक्तरांसाठी एक इमेल गट म्हणून त्याची सुरवात झाली तेंव्हापासून कंपनी आज देशात वैद्यकीय शिक्षणाची प्रगती आणि प्रवेश व्यापक करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करते. या भागीदारीचे उद्दिष्ट अशा आरोग्यसेवा उद्योजकांची पुढील लाट तयार करणे आहे ज्यांच्याकडे विशिष्ट तरीही आवाहनात्मक समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता आहे. आरोग्य सेवा क्षेत्रात मुख्य आव्हाने डेटा, ऑपरेशन्स, लॉजिस्टिक्स आणि ग्राहकांना अनुभव आणि प्रतिबद्धता वाढविण्याभोवती फिरतात आणि हा कार्यक्रम प्रामुख्याने सुरवातीच्या टप्पयातील स्टार्टसॅप्सवर लक्ष केंद्रित करतो. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मराठा आरक्षणासाठी युवकाची आत्महत्या?

**पैठण -** मराठा आरक्षणासाठी २८ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना नारायणगाव येथे घडली. शिवनाथ नारायण बर्डे (२८) असे मृताचे नाव आहे.

शिवनाथने राहत्या घरी रुमालाच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. मृताच्या खिशातून पोलिसांनी चिठ्ठी जप्त केली आहे.

## विसर्जनासाठी गेलेल्या मुलाचा बुडून मृत्यू

**नंदुरबार :** गणेश विसर्जनासाठी गेलेल्या एका १५ वर्षीय मुलाचा तळ्यानजीकच्या चारीची कडा तुटल्याने पाण्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना येथील जिल्हा रुग्णालयासमोरील तळ्यात रविवारी घडली. हर्षल हनुमंत पाटील (१५ रा. हनुमंतखेडा ता. पारोळा, जि. जळगाव) असे मृत मुलाचे नाव आहे.

## रेशनचा गहू, तांदूळ जप्त?

**नांदेड:** पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने काळ्या बाजारात जाणारा रेशनचा तांदूळ आणि गव्हाचा साठा आणि दोन ट्रक शनिवारी रात्री पकडले. कारवाईत दोन ट्रकसह ४५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

गेल्या १५ दिवसांतील ही पाचवी कारवाई आहे. गस्तीवरील पोलिस पथकाने उमरी-तळेगाव रोडवरुन आयशर ट्रक पकडला. ट्रकमध्ये सुमारे ४ लाख रुपयांचा गव्हाचा साठा आढळला. तसेच दुसऱ्या ट्रकमध्ये १ लाख रुपये किमतीचे तांदळाचे कट्टे आढळले. दोन्ही वाहने कारवाईत ताब्यात घेतली. दोन्ही वाहने ताब्यात घेऊन उमरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले, त्याचे नाव उघड केलेले नाही. पुरवठा विभागास पत्रव्यवहार करुन अहवाल मागवला.

## मनोज जरांगे पुन्हा एकदा उपोषणाला बसणार

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आज मध्य रात्रीपासून पुन्हा एकदा उपोषण सुरू करत आहेत. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारकडून होताना दिसत आहे. त्यासाठी खासदार संदिपान भुमरे यांनी जरांगे पाटील यांची भेट देखील घेतली. मात्र, तरी देखील ते उपोषणावर ठाम असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे आता आज मध्यरात्री पासून जरांगे पाटील उपोषण सुरू करतात का? याकडे लक्ष लागले आहे.

## पान १ वरून

### जीभ छाटणाऱ्यास...

महाराष्ट्रात व देशात आरक्षणाच्या मागणीसाठी आग लागली आहे. मागासलेल्या जातींना समाजाच्या बरोबरीने उभे करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात मागासवर्गीय, आदिवासी, ओबीसी व इतर प्रवर्गांना आरक्षणाची तरतूद केली. असे असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याचे विधान केले. या माध्यमातून त्यांनी काँग्रेसचा खरा चेहरा व पोटातील मळमळ ओकून दाखवली. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत आरक्षण व संविधान धोक्यात असल्याचे फेक नरेटिव्ह पसरवले. त्यातून त्यांनी दिनदुबळ्या समाजाची मते घेतली. त्यानंतर आज ते आरक्षण संपवण्याची भाषा करत आहेत. याचा अर्थ त्यांना सर्वच मागासवर्ग, आदिवासी, दलित व इतरांचे आरक्षण संपवायचे आहे. त्यामुळे आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास मी ११ लाख रुपयांचे बक्षीस देईल, असे संजय गायकवाड म्हणाले.

### महाराष्ट्राला जातीयवादाचा...

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला दिलेली तेजाची झळाळी हरवली, असे ते म्हणालेत. शरद पवार म्हणतात सत्ता हातात द्या महाराष्ट्राचा चेहरा बदलून दाखवू. मी त्यांच्या अर्ध्या वक्तव्याशी सहमत आहे. कारण महाराष्ट्राचा चेहरा बदलण्याची असलेली गरज देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केली. याऊलट शरद पवारांमुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी चेहऱ्याला केवळ जातीयवादाचा कॅन्सर झाला. शरद पवारांनी जाती-जातीत वाद लावून महाराष्ट्र अशांत ठेवण्याचे व प्रस्थापितांची घरे भरण्याचे काम केले. आता पवारांनी निवांत राहून हरीनामाचा जप करावा. त्यातून त्यांच्या डोक्यात चांगले काम करण्याची इच्छा जागृत होईल, अशी टीका त्यांनी केली.

### त्यांचे मानसिक संतुलन...

त्यांचे मानसिक संतुलन कळत नाही. त्यांचे डोके सडलेले आहे. झारखंडमध्ये जर लाडकी बहीण सारखीच असलेली योजना चुकीची असेल तर. महाराष्ट्रात ती योग्य कशी? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. या माध्यमातून त्यांनी पुन्हा एकदा लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे. निवडणूक आयोगावर प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, "या देशात निवडणूक आयोग आता स्वतंत्र राहिलेला नाही. निवडणूक आयोग पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या सांगण्यावरूनच निवडणुका जाहीर करतो.

भारतीय जनता पार्टी, आर्वी विधानसभा क्षेत्र



भुमिपूजन सोहळा

दि.१७/०९/२०२४ रोज मंगळवार

वेळ: सकाळी ११:०० वाजता

आर्वी विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री.दादारावजी केचे यांचे अथक प्रयत्नाने आष्टी शहरातील वैशिष्यपूर्ण निधी अंतर्गत ४ कोटी ३४ लक्ष रूपये मंजुर करून आणले. या कामाचा भुमिपूजन सोहळा संपन्न होत आहे.

श्री दादारावजी केचे आमदार, आर्वी विधनसभा क्षेत्र यांचे शुभहस्ते
सौ.सरीताताई वि.गाखरे, माजी अध्यक्षा, जि.प.वर्धा यांचे प्रमुख उपस्थितीत
श्री अशोक विजयकर, जिल्हा महामंत्री भाजपा, माजी गटनेते
श्री.कमलाकर निंभोरकर, भाजपा तालुकाध्यक्ष, आष्टी, तालुका

सर्व नगरसेवक, पदाधिकारी यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे हि विनंती.

| अ.क्र | कामाचे नाव व स्थळ | किंमत |
|---|---|---|
| १. | आष्टी येथे जुने बस स्टॅंड ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | २ कोटी |
| २ | आष्टी येथे प्रभाग ८ मध्ये श्रीराम मंदीर सभागृह बांधकाम करणे. | ३० लक्ष |
| ३. | आष्टी येथे जुनी पंचायत समिती समोर सभागृह बांधकाम करणे. | ३० लक्ष |
| ४ | आष्टी येथे प्रभाग १३ मध्ये गमामाता देवस्थान सभागृह बांधकाम करणे. | २५ लक्ष |
| ५. | आष्टी येथे संत टिपरीवाले बाबा सभागृह बांधकाम करणे. | २० लक्ष |
| ६. | आष्टी येथे प्रभाग १ मध्ये इंडिया सिल्क हाउस ते शिरभाते सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | २० लक्ष |
| ७. | आष्टी येथे प्रभाग १२ मध्ये राजेंद्र मदनकर ते बारी समाज स्मशान भुमी सिमेंट रस्ता बांधकाम | १५ लक्ष |
| ८. | आष्टी येथे प्रभाग १ मध्ये पंजाब माहुरे ते गोरोबा देवस्थान सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | १५ लक्ष |
| ९. | आष्टी येथे प्रभाग १५ मध्ये भवानी माता देवस्थान सभागृह बांधकाम करणे. | १५ लक्ष |
| १०. | आष्टी येथे प्रभाग १ मध्ये पंजाब निशिदकर यांच्या घरासमोरील दुर्गा माता मंदीर परीसराला सौदर्यीकरण करणे. | १५ लक्ष |
| ११ | आष्टी येथे प्रभाग १७ मध्ये सिंदीविहीरा हनुमान मंदीर सभागृह बांधकाम करणे. | १५ लक्ष |
| १२ | आष्टी येथे प्रभाग १२ मध्ये गोलु इंगळे ते दारोकार भुमिगत नाली बांधकाम करणे | १० लक्ष |
| १३ | आष्टी येथे बाकळी नदीवरील स्मशान भुमिजवळ सि.डी.वर्क बांधकाम करणे | १० लक्ष |
| १४ | आष्टी येथे मिलींद विघ्ने ते मेन रोड पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | ७ लक्ष |
| १५ | आष्टी येथे अशोक शिरभाते ते साळवीकर यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे | ७ लक्ष |

विनीत : अॅड.मनिष ठोंबरे, शहर अध्यक्ष भाजपा आष्टी

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
मंगळवार ■ दि. १७ सप्टेंबर २०२४

## गुंतवणुकीच्या नावावर ६९ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
शेअर मार्केट आणि म्युच्यूअल फंडात पैसे गुंतवून बक्कळ नफा कमावण्याचे आमिष दाखवत मायलेकीने एका निवृत्त अधिकाऱ्याला 69 लाखांचा गंडा घातला. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी अरविंद अजाबराव जाधव (61) रा. मेघदूत इस्टेट, हुडकेश्वरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. विद्या गोविंद बडवाईक आणि आर्चिस गोविंद बडवाईक दोन्ही रा. तुमसर, भंडारा असे आरोपी मायलेकीचे नाव आहे.

अरविंद हे पशूसंवर्धन विभागातून सेवानिवृत्त आहेत. 2018 मध्ये अरविंदची मुलगी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत होती. या दरम्यान तिची ओळख आर्चिस हिच्याशी झाली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलगी नोकरीसाठी पुणेला गेली. ट्रांस्पोर्टर असल्याची बतावणी करून आर्चिस नेहमी तिला भेटत होती. दोघांमध्ये चांगली मैत्री झाली. अरविंदही तिला ओळखत होते.

अरविंद यांनी आर्चिसला ते लवकरच सेवानिवृत्त होणार असून विभागाकडून एकूण 70 लाख रुपये त्यांना मिळणार असल्याचे सांगितले. आर्चिसने त्यांना शेअर आणि म्युच्यूअल फंडमध्ये पैसे गुंतविण्याचा सल्ला दिला. अरविंद यांनी वेळोवेळी 69 लाख रुपये तिला दिले. आर्चिस त्यांना पैसे जमा केल्याच्या पावत्याही देत होती. मात्र जेव्हा पैसे काढण्याची वेळ आली तेव्हा ती टाळाटाळ करू लागली. आर्चिसने दिलेल्या पावत्या खोट्या निघाल्या. अरविंद यांनी हुडकेश्वर पोलिसात तक्रार दाखल केली.

# सर्वांगिण विकासासाठी वाहतुकीच्या सुविधा अद्ययावत होणे आवश्यक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रेल्वेचा कायापालट करण्यात येत आहे. देशातील विविध भागातून सुरू होत असलेल्या वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन हा या उपक्रमाचा एक भाग आहे. कुठल्याही देशाच्या सर्वांगीण विकासात सार्वजनिक वाहतूक मार्गांचा विकास मोलाचा ठरत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज अहमदाबाद येथून देशातील सहा वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनचा शुभारंभ करण्यात आला. यात नागपूर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक ८ वर संत्रा मार्केट पश्चिमीद्वार येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी नागपूर - सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.

यावेळी आमदार कृपाल तुमाने, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीणा, मंडळ रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल यावेळी उपस्थित होते. नागपूर हे शहर देशाच्या मध्यभागी आहे. विशेषतःरेल्वे प्रवाशांसाठी हा मार्ग महत्वाचा आहे. देशातील इतर भागाची नागपूर शहराशी कनेक्टिव्हिटी वाढल्यास नागपूर व परिसराचा विकास होण्यास मदत होईल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे जाळे देशविकासात मोलाची भूमिका बजावत असते. रस्ते, रेल्वे आणि विमान या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे यात समावेश आहे. नागपुरातून दक्षिणेकडे जाणा-या अधिक रेल्वे सुरू होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केले.

नागपूर ते सिकंदराबाद वंदे भारत एक्स्प्रेस सुरू व्हावी ही या भागातील नागरिकांची अनेक दिवसांपासून मागणी होती. आज या मागणीला मूर्त रूप आले आहे.मध्य भारताच्या प्रवासी वाहतुकीसाठी वंदे भारतची ट्रेन ही मोलाची उपलब्धी असल्याचे, प्रतिपादन नितीन गडकरी यांनी केले. नागपूर व परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक विकास व्हावा असा प्रयत्न आहे. नागपूर व अजनी रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास करण्यात येत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न असल्याचे केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले.

राज्यपाल राधाकृष्णन यांचे प्रतिपादन : नागपूर - सिकंदराबाद वंदे भारत रवाना



## फॉरेक्स ट्रेडिंग फ्रॉडचा मास्टर माइंड गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
बनावट वेबसाईटच्या माध्यमातून लोकांची फॉरेक्स ट्रेडिंगच्या नावावर 2.59 कोटी रुपयांनी फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा मास्टर माइंड अखेर आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा (ईओडब्ल्यू)च्या हाती लागला. पोलिसांनी कोलकाता येथून त्याला ताब्यात घेतले आहे. विराज सुहास पाटील रा. दहीसर, मुंबई असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

विराजला प्रवर्तन निदेशालय (ईडी)ने ही अटक केली होती. गत काही महिन्यांपासून तो कोलकाताच्या तुरुंगात होता. याच वर्षी फेब्रुवारी महिन्यात ईओडब्ल्यूने विक्रम बजाज नावाच्या व्यापाऱ्याने दिलेल्या तक्रारीवरून विराज पाटीलसह सूरज मधुकर सावरकर, सुरेंद्र मधुकर सावरकर, डॉ. प्रिती नीलेश राऊत, डॉ. नीलेश नरेश राऊत (सर्व रा. सेलू, वर्धा), प्रियंका खन्ना रा. जालंधर, पंजाब, पीआर ट्रेडर्सचा संचालक प्रिंस कुमार, एमआर ट्रेडर्सचा संचालक राकेशकुमार सिंह, टीएम ट्रेडर्सचा संचालक अमन ठाकूर, आरके ट्रेडर्सचा संचालक राहुल कुमार अकेला, मिलन एंटरप्रायजेस ठाणे आणि ग्रीनव्हॅली ॲग्रो कोलकाताविरुद्ध फसवणूक, आयटी ॲक्ट आणि एमपीआयडी ॲक्टसह गुन्हा नोंदविला होता.

### 15 ते 25 टक्के लाभाचे आमिष

विराज आणि सूरज सावरकर या दोघांनी मिळून आयएक्स ग्लोबल अकॅडमी प्रा. लि. आणि टीपी ग्लोबल कंपनीची स्थापना केली होती. इतर आरोपींच्या माध्यमातून त्यांनी आपले जाळे पसरवले. अकॅडमीकडून लोकांना ऑनलाईन फॉरेक्स ट्रेडिंग, शेअर ट्रेडिंग आणि क्रिप्टो मार्केटचे प्रशिक्षण दिले जात होते. फियार्दी विक्रम आणि त्यांच्या मित्रांनी आरोपींशी संपर्क केला असता त्यांनी दरमाह 5 ते 15 टक्क्यांपर्यंत लाभ होण्याची बतावणी केली होती. गुंतवणूकदारांकडून आरोपींनी वरील कंपन्यांमध्ये एकूण 2.59 कोटी रुपये जमा करून घेतले. टीपी ग्लोबल आणि एफएक्स नावाच्या वेब पोर्टलवर शेअर खरेदी-विक्री दिसत होती. मात्र वास्तवात कोणतीही गुंतवणूक केली जात नव्हती. जेव्हा पैसे काढण्याची वेळ आली तेव्हा ग्राहकांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

### न्यायालयातून घेतला प्रोडक्शन वॉरंट

या प्रकरणात जुलै महिन्यामध्ये पोलिसांनी डॉ. प्रिती राऊत हिला अटक केली होती. विराजला ईडीने कोलकाता येथे नोंद प्रकरणात पकडले होते. याबाबत समजताच डीसीपी अर्चित चांडक यांनी पोनि भारती गुरनुले, पोहवा शरद कोकाटे, गजानन गिरी, योगेश निघोट, योगीता पोटभरे आणि मंगेश गौरकर यांना कोलकातासाठी रवाना केले. न्यायालयातून प्रोडक्शन वॉरंट घेतल्यानंतर ईओडब्ल्यूने विराजला अटक केली. न्यायालयाने त्याला 3 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## रस्ते अपघातात अभियंता ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६:
जेवण करण्यासाठी जात असलेल्या दोन अभियंता मित्रांना अज्ञात वाहनाच्या चालकाने जबर धडक दिली आणि फरार झाला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. ही घटना वर्धा मार्गावर घडली.

कुणाल सुकांत विश्वास (22) असे मृताचे नाव आहे. जखमी आशिष शिवप्रसाद पटेल (24) याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुणाल आणि आशिष दोघेही अभियंता असून छत्तीसगडच्या रायपूर येथील मुळ रहिवासी आहेत. दोघेही मिहान येथील एका हेल्थकेअर कंपनीत काम करीत होते आणि खापरीच्या अर्बन ग्लोरी अपार्टमेंटमध्ये ओमकार पटेल नावाच्या मित्रासोबत रहात होते. शनिवारी दोघेही रात्रपाळीत होते. रात्री 9.40 वाजताच्या सुमारास ते सीजी-11/एएक्स-8565 क्रमांकाच्या मोटारसायकलने जेवण करण्यासाठी वर्धा मार्गावरील ढाब्यावर जात होते. डोंगरगावच्या जुना टोल नाक्याजवळ अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांच्या मोटारसायकलला मागून जबर धडक दिली आणि फरार झाला. दोघेही वाहनासह फरफटत जाऊन गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. कुणालचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. नागरिकांनी रुग्णालय बोलावून आशिषला स्वामी विवेकानंद रुग्णालयात भरती केले. घटनेची माहिती मिळताच हिंगणा पोलिस घटनास्थळी पोहोचले.

कुणालचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी एम्स रुग्णालयात रवाना केला. या घटनेचा ओमकारला मोठा धक्का बसला आहे. अपघाताच्या काही वेळापूर्वीच त्याचे कुणालशी फोनवर बोलणे झाले होते. त्याने त्याला जेवणासाठी विचारले होते. पोलिसांनी ओमकारच्या तक्रारीवरून चालकावर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे

### ऑटोच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

ऑटो चालकाच्या निष्काळजीपणामुळे एका वृद्धाचा जीव गेला. ही घटना सीताबर्डी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. सुरेश संपत सिडाव (73) रा. लेंड्रापार्क, रामदासपेठ असे मृताचे नाव आहे.

रविवारी दुपारी 3.30 वाजताच्या सुमारास सुरेश परिसरातील टियाना हॉटेलसमोर उभे होते. या दरम्यान भरधाव असलेल्या अज्ञात ऑटोच्या चालकाने त्यांना मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. यात सुरेश गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी तक्रारीवरून अज्ञात ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## विकेश हत्याकांडाचे आरोपी गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
विकेश आणि निखिल यांच्यात जुने वैमनस्य होते. मी विकेशला मारले नसते तर त्याने मला संपविले असते, अशी माहिती निखिलने चौकशीदरम्यान पोलिसांना दिली आहे.

दोघांमध्ये अनेक दिवसांपासून वाद सुरू होता. विकेश नेहमीच त्याला मारण्याची धमकी देत होता. गत 13 ऑगस्टच्या सकाळी निखिल मित्रासोबत हिवरीनगरकडे जात होता. या दरम्यान विकेशने त्याचा रस्ता अडवला. धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. नंदनवन पोलिसांनी विकेशविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक ही केली होती. त्या घटनेपासून निखिल बदला घेण्याची संधी शोधत होता.

तुरुंगातून बाहेर आल्यानंतर विकेश पुन्हा पडोळेनगर झोपडपट्टीत सक्रीय झाला होता. रविवारी दुपारी 3 वाजताच्या तो सुमारास तो मित्राला भेटायला वस्तीत गेला होता. या दरम्यान निखिल आणि त्याच्या साथीदारांनी घेरून विकेशवर शस्त्रांनी हल्ला करून गंभीर जखमी केले आणि त्यानंतर दगडाने डोके ठेचून ठार मारले.

पोलिसांनी विकेशची पत्नी कोमलच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत रात्री उशिरा चारही आरोपींना अटक केली. सोमवारी चौघांनाही न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना 4 दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या पर्वावर मान्यवरांच्या शुभेच्छा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
ईद-ए-मिलाद च्या शुभ पर्वावर आमदार विकास ठाकरे, पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल, उप आयुक्त राहुल मदने यांनी छोटा मोमीन पुरा म्हणून ओळख असलेले अवस्थी नगर,जाफर नगर या ठिकाणी भेट दिली.

इस्लाममध्ये ईद-ए-मिलाद-उन-नबीचा दिवस खूप खास मानला जातो. हा सण 16 सप्टेंबर रोजी साजरा होत आहे. हा दिवस विशेषतः पैगंबर मुहम्मद यांच्या जन्माचे प्रतीक आहे असे मानले जाते की हा खास दिवस आहे. जेव्हा प्रेषित मुहम्मद यांचा जन्म झाला होता. अशा परिस्थितीत, या खास प्रसंगी लोक प्रेषित मुहम्मद यांच्या वाढदिवसानिमित्त एकमेकांना शुभेच्छा देतात.

याच शृंखलेत सोमवारी नागपुरातील मुस्लिम समाजाने छोटा मोमीनपुरा जाफर नगर अवस्ती नगर येथे ईद मिलाद-उन-नबीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला आणि समाजातील ज्येष्ठांच्या नेतृत्वाखाली धार्मिक घोषणांनी मिरवणुकीला सुरुवात केली. समाजातील तरुण-तरुणींनी हातात धार्मिक दिवे घेऊन घोषणाबाजी करत मोर्चा काढला मिरवणुकीत समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी तगडा पोलिस बंदोबस्त होता.

### घरात घुसून बालिकेवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:
एका तरुणाने दिवसाढवळ्या घरात घुसून 8 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी पीडितेच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

पीडित बालिका ही आई-वडिलांसह पारडी ठाण्यांतर्गत राहते. आई-वडील हे दोघेही बांधकाम मजूर आहेत. रविवारी सकाळी दोघेही कामावर गेले होते. घरी पीडिता आणि लहान बहीण होती. दोघ्याही सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास घरापुढे खेळत होत्या. या दरम्यान अंदाजे 30 ते 35 वर्षे वयोगटातील आरोपी त्यांच्या घरी आला. वडिलांचे नाव सांगून विचारपूस केली. पीडितेने आई-वडील कामावर गेल्याची माहिती दिली. लहान बहिणीला बाहेर बसवून आरोपी पीडितेला घरात घेऊन गेला. याच दरम्यान आरोपीने तोंड दाबून पीडितेवर लैंगिक अत्याचार केला. मुलगी रडू लागली असता अल्पोहारासाठी तिच्या हातात 20 रुपये दिले. तसेच मारण्याची धमकी दिली आणि फरार झाला. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. या प्रकरणात ओळखीच्या व्यक्तीचा सहभाग असल्याचा संशय आहे.

## आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज साठी जागा देणार - जिल्हाधिकारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६:
शासनाने नागपुरात चित्रनगरीसाठी 100 हेक्टर जागा देण्याचे जाहीर केले असून त्याच्याच बाजूला आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज साठी जागा मिळावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.



चिटणवीस सेंटर व महाकल्प आर्टिस्ट अकादमी (मा), यांच्या संयुक्त विद्यमाने फ्यूजन ऑफ क्रिएटिव्हीटी या चार दिवसीय प्रदर्शनाचे भारत भवन, भोपाळचे ग्राफिक आणि सिरॅमिक विभागाचे माजी विभाग प्रमुख देवीलाल पाटीदार व जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, डॉ शालिनी इटनकर यांच्या हस्ते थाटात उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

रंगायन कलादालन, चिटणविस सेंटर, सिव्हिल लाइन्स येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिटणवीस सेंटरचे विश्वस्त विलास काळे होते तर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई डॉ. विश्वनाथ साबळे व चोलामंडल आर्टिस्ट व्हिलेज, चेन्नईचे राजू दुरशेट्टीवार, महाकल्प आर्टिस्ट अकादमीचे अध्यक्ष चिटणविस सेंटरचे संयोजक रवींद्र दुरुगकर यांची उपस्थिती होती.

प्रदर्शनाच्या कॅटलॉगचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विलास काळे यांनी कलाकारांसाठी आर्ट अँड क्राफ्ट व्हीलेज तयार करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मदत करावी अशी भुमिका मांडली.

कलाकारांच्या कलाकृती विकण्यासाठी तेथे आउटलेट असावे. त्याने पर्यटन वाढेल, कलाकार यांच्या मध्ये सकारात्मकता येईल असे ते म्हणाले. इटणकर यांनी यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे बोलणार असल्याचेही सांगितले. देवीलाल पाटीदार यांनी विचार मांडले. कार्यक्रमाला मा चे उपाध्यक्ष शरद सहारे, सचिव आशिष बोदडे व कोषाध्यक्ष प्रो. नंदकिशोर मानकर, चंद्रकांत चन्ने आदींची उपस्थिती होती.

चित्रकार विजय काकडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रवींद्र दुरुगकर यांनी प्रास्ताविक केले. नंदकिशोर मानकर यांनी आभार मानले. या प्रदर्शनात देशभरातील 60 कलावंतांच्या कलाकृती सादर केल्या जातील. त्यात पेंटिंग, शिल्प, ग्राफिक व छायाचित्रणांचा समावेश आहे.

हे प्रदर्शन 19 सप्टेंबर पर्यंत सर्वांसाठी खुले राहील. 18 तारखेला सायं. 4.30 वाजता अब्दुल गफ्फार यांचे व्यक्तिचित्रणाचे तर प्रा. मौक्तिक काटे यांच्या शिल्पकलेचे प्रात्यक्षिक होणार असून 19 तारखेला राजु दुशेट्टीवार अमूर्त चित्रकलेचे प्रात्यक्षिक सादर करतील. कलेचा प्रसार करण्याच्या हेतूने सातत्याने कार्यरत असलेले चिटणवीस सेंटर "रंगायन चित्रपल्लवी" या श्रृंखलेअंतर्गत या प्रदर्शनाचे आयोजन करीत आहे.




■ नागपूर : स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही मदारी समाजाला न्याय मिळाला नाही, जात आणि अन्य प्रमाणपत्र मिळाले नाहीत, त्यांच्या नशिबी उपेक्षितांचे जीणे आहे, त्यांच्यावरील अन्याय दूर करावा यासाठी मदारी समाजाच्यावतिने सोमवारी नागपूर येथे भव्य मोर्चा काढण्यात आला.

# स्टेट बोर्डाच्या शाळांमध्येही आता सीबीएसई अभ्यासक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६:

सध्या राज्यभरात कॉन्व्हेंट शिक्षण पद्धतीला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. कॉन्व्हेंट संस्कृती दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शहर आणि तालुक्यांच्या ठिकाणांसह मोठ्या गावांतही इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळा सुरू झाल्या आहेत, कुठे होत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य गोरगरिबांच्या मुलांसाठी सुरू असलेल्या शाळांमधील विद्यार्थी पटसंख्या प्रचंड रोडावली आहे. शिवाय, कमी पटसंख्येमुळे या शाळांही अडचणीत आल्या आहेत.

प्रत्येकच पालक आपल्या पाल्यास चांगले शिक्षण मिळावे, या उद्देशाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवण्यासाठी आग्रही असतो. आर्थिक परिस्थिती नसतानाही पालकवर्ग मोठमोठ्या आणि प्रचंड फी असलेल्या शाळांमध्ये आपल्या पाल्याला शिकवतो. राज्यात कॉन्व्हेंट संस्कृती वाढत असतानाच ह्यसीबीएसईह्ण अभ्यासक्रमामुळे त्यात अधिकच भर पडली आहे.

प्रत्येक पालकाचा आणि विद्यार्थ्याचा ओढा सीबीएसई अभ्यासक्रमाकडे असतो. भविष्यात उच्च शिक्षण घेण्यासाठी पाया मजबूत व्हावा, याकरिता सीबीएसई अभ्यासक्रम आवश्यक आहे, असा सर्वांचा समज.

स्टेट बोर्ड अर्थात राज्य शिक्षण मंडळांतर्गतच्या शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या घसरण्यासाठी अभ्यासक्रम हा मुख्य कारणीभूत घटक असल्याचा आरोप गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्येही सीबीएससी बोर्डाच्या धर्तीवर अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे.

त्यासाठी तिसरी ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रमही निश्चित करण्यात आला आहे. तो पुढील शैक्षणिक वर्षापासून शिकविला जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच ही माहिती दिली.

**आचारसंहितेपूर्वी मराठी भाषा भवनचे उद्घाटन**

मरिन लाईन्स येथे मराठी भाषा विभागाकडून मराठी भाषा भवन उभारले जाणार आहे. या इमारतीचे भूमिपूजन आचारसंहिता लागू होण्यापूर्वी केले जाईल. नवी मुंबई येथे बांधण्यात येणाऱ्या साहित्य भवनाचे भूमिपूजनही आचारसंहितेपूर्वी केले जाणार आहे. साहित्य भवनात साहित्यिकांना राहण्याच्या व्यवस्थेबरोबरच ग्रंथालय, साहित्य दालन, आदी सुविधा असतील, असे दीपक केसरकर यांनी सांगितले.

अकरावी आणि बारावीच्या वर्गांसाठी मराठी भाषा विषय अनिवार्य करण्यात आल्याचेही त्यांनी मंत्रालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले. राज्यात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबाबत आराखडा तयार करण्यात आला आहे. सीबीएसईच्या शाळांचे वेळापत्रक आणि सुद्धया वेगळ्या असतात. राज्य मंडळाच्या शाळांमध्ये त्याप्रमाणे बदल करण्याबाबत शिक्षक संघटनांशी चर्चा करणार आहे, असे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी स्पष्ट केले.

राज्यातील अंगणवाडीसेविकांवर आता शिशुवर्गातील (बालवाटिका, बालवाटिका १-२) मुलांना शिकविण्याची जबाबदारी सोपवली जाणार आहे. राज्यात एकूण ४८ हजार अंगणवाड्या आहेत. त्यातील अंगणवाडीसेविकांना शालेय शिक्षण विभागाकडून प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी लागणाऱ्या पुस्तकांची छपाई महिला व बालविकास विभागाकडून केली जाणार असल्याचेही केसरकर यांनी सांगितले.

राज्यात व्यावसायिक शिक्षणही बंधनकारक केले असून, व्यावसायिक शिक्षणाबरोबरच एक परदेशी भाषाही शिकवली जाणार आहे. व्यावसायिक शिक्षण आणि परदेशी भाषेचे शिक्षण एकाच वेळी मिळणार असल्यामुळे परदेशात नोकरीसाठी जाण्याची इच्छा असलेल्या मुलांना याचा फायदा होणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पैशांची उधळपट्टी पडली महागात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

चोरीच्या पैशांची उधळपट्टी करणे दोन आरोपींना महागात पडले. पोलिसांना त्यांचा सुगावा लागला आणि दोघांच्याही मुसक्या आवळण्यात आल्या.

**घरफोडीचे आरोपी पोलिसांच्या हाती**

चौकशीत त्यांच्याकडून घरफोडीचे 10 गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्यांच्याकडून 2 लाख 86 हजार रुपये किंमतीचा मुद्देमालही जप्त केला. तरुण उर्फ तुफान मेश्राम (24) रा. जेपीनगर आणि अमन बारसागडे (26) रा. वाडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

वाडी ठाण्यांतर्गत राहणारे एक कुटुंब जेवणासाठी बाहेर गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी घरफोडी करून टीव्ही व रोख 30 हजार रुपयांचा माल चोरी केला. घरी परतल्यावर चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. वाडी पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. खबऱ्यांना कामावर लावण्यात आले. दरम्यान दोन तरुण कुठलाच कामधंदा न करता पैशांची उधळपट्टी करीत आहेत. दारू, जुगार आणि मित्रांवर पैसे उधळत आहेत. एकाने नवीन दुचाकीही खरेदी केली असल्याची माहिती खबऱ्याकडून पोलिसांना मिळाली. दोघांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी चोरीची कबुली दिली.

सखोल चौकशीत त्यांनी वाडी, गिट्टीखदान हद्दीत 7 आणि ग्रामीण भागातही घरफोडी केल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून 2 लाख 86 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक एस.बी. देशमुख, सहायक पोलिस निरीक्षक राहुल सावंत, तुलसीदास शुक्ला, अजय पाटील, दुर्गादास माकडे, सोमेश्वर वर्धे, राहुल बोटरे यांनी केली.

# गहाण ठेवलेली चेन लुटल्याची खोटी तक्रार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

सेंट्रल अव्हेन्यू मार्गावर दिवसाढवळ्या दुचाकीस्वार दोन आरोपींनी तरुणाच्या गळ्यातील एक लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन हिसकावली आणि फरार झाले. तक्रार मिळताच पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून तत्काळ तपास सुरू केला. मात्र हे प्रकरण बनावट निघाले. तक्रारकर्त्या तरुणाने त्याची चेन गहाण ठेवून लुटीचा बनाव केला होता.

भावसार चौकात राहणारा प्रणव केशव कन्हेरे (27) हा फर्निचरचा व्यवसाय करतो. शुक्रवारी सायंकाळी त्याने पोलिसात लुटपाट झाल्याची तक्रार केली. तो मित्रासोबत फोनवर बोलत होता. या दरम्यान दुचाकीस्वार दोन अज्ञात आरोपी त्याच्याजवळ आले. मागच्या सीटवर बसलेल्या तरुणाने त्याच्या गळ्यातील एक लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन हिसकावली व फरार झाले. गणेशपेठ पोलिसांनी आरोपींवर गुन्हा नोंदविला. गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकानेही घटनेचा तपास सुरू केला. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले. स्थानिकांना विचारपूस केली. मात्र अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आले. खाक्या दाखवताच त्याने खोटी तक्रार केल्याची कबुली दिली.

चौकशीदरम्यान प्रणवने सांगितले की, त्याने व्यावसायिक देवाण-घेवाणीसाठी उधारीत सामान घेतले होते. त्या सामानाचे पैसे परत करण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यामुळे त्याने त्याची सोन्याची चेन इतवारीच्या कक्कड ज्वेलर्सकडे गहाण ठेवून उधारीचे पैसे दिले. कुटुंबीय चेनबाबत विचारपूस करतील म्हणून त्याने लुटीचा बनाव केला. गुन्हे शाखेने ज्वेलर्सकडून चेन जप्त केली आहे. पुढील तपास गणेशपेठ पोलिस करीत आहेत. गणेशपेठचे ठाणेदार मछिंद्र पंडित यांनी सांगितले की, बी-फायनल रिपोर्ट फाईल करण्यासोबतच प्रणवविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गणराज रंगी नाचतो...



*नागपूर :* दै. महासागर कार्यालयाच्या मुद्रण विभागात कार्यरत आदेश सहारे यांच्या घरी मागील दहा दिवसांपासून विराजमान झालेले गणराया.







*नागपूर :* उपराजधानीत शेकडोच्यावर सार्वजनिक गणेश मंडळानी गणरायाची स्थापना केली असून, या मंडळाकडून मागील दहा दिवसापासून विविध उपक्रम राबविले जात आहेत.



*नागपूर :* गेल्या अनेक काही दिवसापासून विराजमान बाप्पाला काही भाविकानी नवव्या दिवशी निरोप दिला.





*नागपूर :* सार्वजनिक गणेश मंडळानी स्थापना केलेले बाप्पा.